म्हाडा
MHADA

# कोंकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ

(म्हाडाचा प्रादेशिक घटक)

## माहिती पुस्तिका जुलै २०२५






ऑनलाईन सोडत
०३/०९/२०२५

१५% एकात्मिक,
२०% सर्वसमावेशक,
५०% परवडणाऱ्या
**५३६२**
सदनिका व भूखंड विक्री
तसेच म्हाडा कोंकण
मंडळ योजनेअंतर्गत
संगणकीय सोडत

**सन २०२५**


कोंकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ
गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.


म्हाडा - प्रत्येकाच्या गृहस्वप्नपूर्ततेसाठी कटिबद्ध असलेली आपली हक्काची संस्था



**मा.ना.श्री. देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य



**मा.ना.श्री. एकनाथ शिंदे**
उपमुख्यमंत्री,
गृहनिर्माण मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा
पालकमंत्री, ठाणे जिल्हा



**मा.ना.श्री. अजित पवार**
उपमुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य



**मा.ना.डॉ. पंकज भोयर**
गृहनिर्माण राज्यमंत्री,
महाराष्ट्र शासन



**श्री. असीम कुमार गुप्ता**
अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन



**श्री. संजीव जयस्वाल** (भा.प्र.से.)
उपाध्यक्ष तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण



**श्रीमती रेवती गायकर**
मुख्य अधिकारी,
कोंकण मंडळ

# कोंकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ
# अनुक्रमणिका



| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | कोंकण मंडळ (म्हाडा) संगणकीय सोडत जुलै, २०२५ चे वेळापत्रक | १ |
| २ | विविध वसाहतीतील विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या सदनिकांचा तपशील | २ ते ५ |
| ३ | आरक्षित गटाचे नांव व विवरण तक्ता तसेच विविध वसाहतीतील सदनिकांचा आरक्षणनिहाय तक्ता (परिशिष्ट क्र. ३ ते ३.४) | ६ ते १७ |
| ४ | पात्रतेच्या अटी व शर्ती | १८ ते २० |
| ५ | सदनिकांच्या संगणकीकृत अर्ज भरण्याची कार्यपद्धती | २१ ते २३ |
| ६ | सदनिकांच्या संगणकीकृत सोडतीची कार्यप्रणाली | २४ ते २७ |
| ७ | सदनिकांची विक्री किंमत भरणा करावयाच्या अटी व शर्ती | २८ ते ३० |
| ८ | विशेष अटी व शर्ती | ३१ |
| ९ | १५% एकात्मिक योजना (ITP) व २०% सर्व समावेक्षक योजनांअंतर्गत सदनिकांची माहिती | ३२ |
| १० | कोंकण मंडळ योजने अंतर्गत सदनिकांची माहिती | ३३ ते ३७ |
| ११ | एकात्मिक गृहनिर्माण सोडत प्रणाली २.०<br>Integrated Housing Lottery Management System version 2.0 (IHLMS 2.0) | ३८ ते ४१ |
| १२ | अर्जदाराने अपलोड करावयाचे कागदपत्रे/दाखले/प्रमाणपत्र यांचे नमुने | ४२ ते ५१ |
| १३ | विशेष सुचना | ५२ |
| १४ | संपर्क क्रमांक | ५३ |
| १५ | सावधानतेचा इशारा | |

## १. कोंकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ (म्हाडा) सोडत २०२५-२६ चे प्रस्तावित वेळापत्रक

| अ. क्र. | सोडत टप्पेनिहाय तपशिल | जाहिरातीमध्ये दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | उच्च स्तरीय समिती (OSC) बैठक | ११/०७/२०२५, दुपारी ०३.०० वा. |
| २ | सोडतीसाठी जाहिरात प्रसिध्द करणे | १४/०७/२०२५ |
| ३ | सोडतीसाठी ऑनलाईन अर्जाची स्विकृतीची सुरुवात (Curtain Raiser) | १४/०७/२०२५, दुपारी १.०० वाजल्यापासून |
| ४ | ऑनलाईन पेमेंट स्विकृतीची सुरुवात | १५/०७/२०२५, दुपारी १२.०० वाजल्यापासून |
| ५ | सोडतीसाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा शेवटचा दिनांक व वेळ | १३/०८/२०२५, रात्रौ ११.५९ वाजेपर्यंत |
| ६ | a) ऑनलाईन पेमेंट स्विकृती करण्याचा अंतिम दिनांक व वेळ<br>b) बँकेत RTGS/NEFT द्वारे अनामत रक्कम भरणा करण्यासाठी चलन निर्मितीचा अंतिम दिनांक व वेळ | १४/०८/२०२५, रात्रौ ११.५९ वाजेपर्यंत |
| ७ | सोडतीसाठी स्विकृत अर्जाच्या प्रारुप यादी प्रसिध्दी दिनांक व वेळ | २१/०८/२०२५, सायंकाळी ०६.०० वाजता |
| ८ | प्रारुप यादी प्रसिध्द झाल्यापासून ऑनलाईन दावे - हरकती दाखल करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | २५/०८/२०२५, सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत |
| ९ | सोडतीसाठी पात्र ठरलेल्या अर्जदारांची अंतिम यादीची प्रसिध्दी दिनांक व वेळ | ०१/०९/२०२५, सायंकाळी ०६.०० वाजता |
| १० | उच्च स्तरीय समितीच्या देखरेखीमध्ये Dry Run | ०२/०९/२०२५ |
| ११ | सोडत दिनांक व वेळ | ०३/०९/२०२५, सकाळी १०.०० वाजता |
| १२ | प्रस्तावित सोडत स्थळ | डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह, ठाणे (पश्चिम) |
| १३ | सोडतीमधील यशस्वी व प्रतिक्षायादीवरील अर्जदारांची नावे म्हाडाच्या संकेत स्थळावर प्रसिध्दी दिनांक व वेळ | ०३/०९/२०२५, सायंकाळी ०६.०० वाजता |

## २. विविध वसाहतीतील विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या सदनिकांचा तपशील

| अ. क्र. | योजनेचा संकेत क्र. | योजनेचे नाव | उत्पन्न गट | विक्रीसाठी उपलब्ध एकूण सदनिका | | | सदनिकेचे चटई क्षेत्रफळ (चौ.मी.) | सदनिकेची अंदाजित विक्री किंमत (₹) | अर्जासोबत भरावयाची अनामत रक्कम व अर्ज शुल्क ₹ ५००/- + जीएसटी @ १८% ₹ ९०/- = एकूण ₹ ५९०/- | रेरा नोंदणी क्रमांक /भोगवटा प्रमाणपत्राबाबतची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | आरक्षित प्रवर्ग | सर्वसाधारण जनता | एकूण सदनिका | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| **(अ) २०% सर्वसमावेशक गृहनिर्माण योजना**<br>(सदर योजनेअंतर्गत लाभार्थींनी एकूण विक्री किंमतीच्या १% इतकी रक्कम कोंकण गृहनिर्माण क्षेत्रविकास मंडळास प्रशासकिय आकार म्हणून भरणा करणे क्रमप्राप्त आहे. तसेच उर्वरित विक्री किंमत ही विकासकास भरावयाची आहे (विकास नियंत्रण नियमावली नुसार सोसायटी चार्जेस, विद्युत आकार व इतर चार्जेस विकासकास भरणे तसेच सदनिकांचा हप्ता टप्पेनिहाय नियमानुसार विकासकाकडे भरणा करणे बंधनकारक राहील) | | | | | | | | | | |
| ०१ | ३८७-अ | स्कायलार्क इन्फ्रा स्ट्रक्चर, कौसा, ठाणे | अल्प | १ | ० | १ | ४९.५६ | २०५८२००/- | १०५९०/- | P51700020333 |
| ०२ | ३८८-अ | ग्लोरी टाऊनशिप एलएलपी, डायघर, ठाणे | अल्प | ० | २ | २ | ४१.१७ | २३२४४००/- | १०५९०/- | P51700023234 |
| ०३ | ३९६-अ | चल्लमा इन्फ्रा प्रॉपर्टीज | अल्प | ४ | ६ | १० | ३४.२० ते ३५.१७ | १३५४४००/- ते १६०४०००/- | १०५९०/- | P51700020162 |
| ०४ | ४००-अ | कल्पेश्वर होम एलएलपी गोलवली, डोंबिवली | अल्प | २ | ३ | ५ | ३६.३९ ते ५०.४५ | १६४२३००/- ते २२७६७००/- | १०५९०/- | P51700049543 |
| ०५ | ४०१-अ | थारवानी इन्फ्रा स्ट्रक्चर्स, गांधरे कल्याण | अल्प | ० | १ | १ | ५०.१५ | ३०९९७००/- | १०५९०/- | Wing A P51700050201 Wing B P51700049934 |
| ०६ | ४०२-अ | सद्गुरु डेव्हलपर्स टिटवाळा, कल्याण | अत्यल्प | ० | २ | २ | २९.४५ | १५९०७००/- | ५५९०/- | P51700028547 |
| ०७ | ४०४-अ | सनराज कन्स्ट्रक्शन, गोलवली, कल्याण | अल्प | ३ | २ | ५ | ३८.७० | १९५४७००/- | १०५९०/- | P51700026868 |
| ०८ | ४०५-अ | गौरी विनायक बिल्डर्स अँड डेव्हलपर्स प्रा.लि., तीसगाव, कल्याण | अत्यल्प | ४ | ३ | ७ | २४.४५ ते २८.९८ | ९५५८००/- ते ११३२१००/- | ५५९०/- | P51700022647 |
| ०९ | ४०७-अ | स्वस्तिक रिएलेटर्स, कांचनगाव, डोंबिवली (पूर्व) | अल्प | ८ | ६ | १४ | ३०.७५ ते ४९.१० | १३२५१००/- ते २११५७००/- | १०५९०/- | P51700030468 |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | ४०८-अ | थारवानी इन्फ्रा स्ट्रक्चर्स, टिटवाळा | अत्यल्प | ० | ४ | ४ | २९.७५ ते २९.८७ | १७०६१००/- ते १७१०८००/- | ५५९०/- | P51700033028 |
| ११ | ४०९-अ | थारवानी इन्फ्रा स्ट्रक्चर्स, टिटवाळा | अल्प | १५ | १५ | ३० | ३०.५३ ते ५४.८० | १७१८४००/- ते ३०५६७००/- | १०५९०/- | P51700033028 |
| १२ | ४१०-अ | एकता रिएलेटर्स, नांदिवली, ठाणे | अल्प | ० | २ | २ | ५१.८३ ते ५१.९५ | ३००२८००/- ते ३००९८००/- | १०५९०/- | P51700028856 |
| १३ | ४१६ | बीकेएस गॅलेक्सी रिएलेटर्स एलएलपी दिघा, नवी मुंबई | अत्यल्प | ५४ | ५८ | ११२ | २९.१० | १८५९६००/- | ५५९०/- | P51700050973 P51700051868 |
| १४ | ४१७ | पिरॅमिड डेव्हलपर्स नेरुळ, नवी मुंबई | अल्प | ९ | ९ | १८ | ४२.४४ ते ५४.५९४ | २३४३७०० ते ३०१५३००/- | १०५९०/- | P51700052732 |
| १५ | ४१८ | डीपीव्हीजी व्हेंचर्स एलएलपी सानपाडा, नवी मुंबई | अत्यल्प | ० | २ | २ | २९.०६ | १४४२७००/- | ५५९०/- | P51700077727 |
| १६ | ४१९ | | अल्प | ८ | ९ | १७ | ३७.१७२ ते ४९.९९८ | १८४५५००/- ते २४८२१००/- | १०५९०/- | P51700077727 |
| १७ | ४२० | निलकंठ इन्फ्राटेक घणसोली, नवी मुंबई | अल्प | ९ | ९ | १८ | ३२.५२२ ते ४८.१९४ | १६११८००/- ते २५०८०००/- | १०५९०/- | P51700052959 |
| १८ | ४२१ | सिझन सहारा आडीवली/डोकाळी व पिसवली, कल्याण | अल्प | १९ | १८ | ३७ | ३०.५५ ते ४१.६१ | १८९०६००/- ते २५७५१००/- | १०५९०/- | P51700077929 |
| १९ | ४२२ | अभिदर्शन कॉर्पोरेशन एलएलपी टिटवाळा, कल्याण | अत्यल्प | २६ | ३० | ५६ | २८.९६ ते २९.४८ | १९६०९००/- ते १९९५४००/- | ५५९०/- | P51700055643 |
| २० | ४२३ | कामधेनू ग्रँड्युअर सानपाडा, नवी मुंबई | अल्प | ८ | ९ | १७ | ४२.३२० ते ४९.९२ | २३९९०००/- ते २८३०१००/- | १०५९०/- | P51700055665 |
| २१ | ४२४ | निलकंठ इन्फ्राटेक घणसोली, नवी मुंबई | अल्प | १० | ११ | २१ | ३६.३२३ ते ४६.२२८ | २१४६४००/- ते २७३२३००/- | १०५९०/- | P51700052965 |
| २२ | ४२५ | अल अबराज डेव्हलपर्स ठाणे | अल्प | ११ | १२ | २३ | ३७.९७ ते ४५.९५ | १७५५५००/- ते २१२६५००/- | १०५९०/- | P51700027277 |
| २३ | ४२६ | के. एम. डेव्हलपर्स ओवळे, ठाणे | अल्प | ५ | ५ | १० | ३२.२९ ते ४४.०५ | १६४२५००/- ते २२४२१००/- | १०५९०/- | P51700028504 |
| २४ | ४२७ | मेट्रो ड्रीम होम्स डायघर, ठाणे | अल्प | १४ | १४ | २८ | ३५.१२ ते ४०.२९ | १५८९१००/- ते १६५५९००/- | १०५९०/- | P51700021343 |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २५ | ४२८ | आशर डेव्हलपर्स ठाणे | अल्प | ६ | ६ | १२ | ४९.१६ ते ४९.७८ | ३३५५०००/- ते ३३९६९००/- | १०५९०/- | P51700056361 |
| २६ | ४२९ | थारवाणी प्रॉपर्टी, कल्याण | अल्प | ३ | ३ | ६ | ५३.१९ | २२४१०००/- | १०५९०/- | P51700033028 P51700049317 P51700054327 |
| २७ | ४३० | धरती धन कन्स्ट्रक्शन्स, बोळींज | अत्यल्प | १९ | १८ | ३७ | २६.४८ | १३२९९००/- | ५५९०/- | PR1241012400081 |
| २८ | ४३१ | उन्नती असोसिएट्स (रौनक बिल्डर्स), ठाणे | अल्प | १८ | १४ | ३२ | ३८.३८ ते ३९.८४ | २०८४२००/- ते २१६४६००/- | १०५९०/- | P51700028435 |
| २९ | ४३२ | रिलाएबल रिअल टच सातिवली, वसई, पालघर | अत्यल्प | ५ | ५ | १० | २१.३० ते २२.४५ | ९६८६००/- ते १०२१०००/- | ५५९०/- | P99000003885 |
| ३० | ४३३ | | अल्प | १३ | १३ | २६ | ३१.०३ ते ३९.०३ | १४११०००/- ते १७७५०००/- | १०५९०/- | P99000003885 |
| | | | **एकूण (अ)** | **२७४** | **२९१** | **५६५** | | | | |
| **(ब) १५% एकात्मिक शहर गृहनिर्माण योजना** (नमूद संकेत क्रमांक अंतर्गत कोंकण मंडळ योजनेमध्ये उपलब्ध सदनिका विक्रीकरिता उपलब्ध करण्यात आले आहेत) | | | | | | | | | | |
| ३१ | ४१४-अ | होराइझन प्रोजेक्ट प्रा. लि. उसरघर, सांडप, ठाणे रुणवाल डेव्हलपर्स | अत्यल्प | ६८ | ७३ | १४१ | २८.०८ | १३४०५००/- | ५५९०/- | P51700079091 |
| ३२ | ४१५-अ | | अल्प | १५३ | २७९ | ४३२ | ३९.८६ ते ४०.०० | १९०३३००/- ते १९१३८००/- | १०५९०/- | P51700079091 |
| ३३ | ४३४ | मॅक्रो टेक डेव्हलपर्स, धारीवली, कल्याण (लोढा डेव्हलपर्स) | अल्प | ११६९ | १२६० | २४२९ | ४९.५६ ते ४९.७२ | २१३७७००/- ते २१,९८,२००/- | १०५९०/- | P51700079713 P51700079649 P51700079712 P51700079715 |
| | | | **एकूण (ब)** | **१३९०** | **१६१२** | **३००२** | | | | |
| **(क) म्हाडा कोंकण गृहनिर्माण योजना** (नमूद संकेत क्रमांक अंतर्गत कोंकण मंडळ योजनेमध्ये उपलब्ध * विखुरलेल्या सदनिका आहे त्या स्थितीमध्ये विक्रीकरिता उपलब्ध) | | | | | | | | | | |
| ३४ | *११७-ड | मिरारोड, ठाणे | अत्यल्प | १ | १ | २ | २१.०० | ३६१९७२८/- | ५५९०/- | |
| ३५ | *११८-ड | मिरारोड, ठाणे | अत्यल्प | १ | १ | २ | २१.०० | ३६१९७२८/- | ५५९०/- | |
| ३६ | *२५४-क | मिरारोड, ठाणे | अत्यल्प | ६ | ११ | १७ | २१.०० | ३६१९७२८/- | ५५९०/- | |
| ३७ | *२५५-क | मिरारोड, ठाणे | अल्प | २ | १ | ३ | ३०.९४ | ५२९९२७४/- | १०५९०/- | |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३८ | *२६५-ब | मिरारोड, ठाणे | अत्यल्प | ८ | १३ | २१ | २१.०० | ३६१९७२८/- | ५५९०/- | |
| ३९ | *२६६-ब | कावेसर, ठाणे | अल्प | ५ | १३ | १८ | ३५.४३ | ५१०१७००/- | १०५९०/- | P51700007437 |
| ४० | *२७६-क | बाळकुम, ठाणे | मध्यम | १९ | ९ | २८ | ६७.०७ | ८४८५६१०/- | १५५९०/- | P51700003172 |
| ४१ | *३५३-क | टीव्ही जर्नलिस्ट असोसिएशन ठाणे | अल्प | ५१ | ० | ५१ | ३१.६० ते ३३.१६ | ४००१५००/- ते ४१९९०००/- | १०५९०/- | P51700024260 |
| ४२ | ४१२-अ | शिरढोण, कल्याण | अल्प | २५३ | २७२ | ५२५ | ४४.९८ | ३५६६६८९/- | १०५९०/- | P51700016820 |
| ४३ | *४१३-अ | ठाणे पत्रकार संघ | अल्प | ५३ | ० | ५३ | २५.०० | २१२२९९३/- | १०५९०/- | P51700007389 |
| ४४ | ४३५ | गोठेघर, नवी मुंबई | अल्प | ४३ | ४५ | ८८ | ४७.८५ | ३६८१०९२/- | १०५९०/- | P51700029534 |
| ४५ | ४३६ | चितळसर, मानपाडा, ठाणे | अल्प | ४१७ | ४५२ | ८६९ | ३२.६६ ते ३३.१० | ५१८३९८०/- ते ५२५४६९५/- | १०५९०/- | P51700006925<br>P51700007320 |
| | | | **एकूण (क)** | **८५९** | **८१८** | **१६७७** | | | | |
| **(ड) म्हाडा कोंकण गृहनिर्माण योजना**<br>**(नमूद संकेत क्रमांक अंतर्गत कोंकण मंडळ योजनेमध्ये उपलब्ध भूखंड आहे त्या स्थितीमध्ये विक्रीकरिता उपलब्ध करण्यात आले आहेत)** | | | | | | | | | | |
| ४६ | ५-अ | कुळगाव, बदलापुर, प्लॉट नं.३२७ सर्व्हे नं.४२ | मध्यम | ० | १ | १ | ७६ | ६६६५२० | १५५९०/- | |
| ४७ | २५३-ब | ओरस, सिंधुदुर्ग प्लॉट्स | उच्च | ३९ | ३७ | ७६ | ५९.३० ते १७७.६५ | ३८३४८९.५४ ते ११४८८५१.८९ | २०५९०/- | |
| | | | **एकूण (ड )** | **३९** | **३८** | **७७** | | | | |
| **(इ) म्हाडा कोंकण गृहनिर्माण योजना**<br>**(५०% परवडणाऱ्या सदनिका)** | | | | | | | | | | |
| ४८ | ४३७ | आशर डेव्हलपर्स, माजिवडे, ठाणे | अत्यल्प | २० | २१ | ४१ | २४.३४ | ४५०९७५०/- | ५५९०/- | P51700016015<br>P51700016016 |
| | | | **एकूण (इ )** | **२०** | **२१** | **४१** | | | | |
| | | **एकूण (अ+ब+क+ड+इ=ई)** | | **२५८२** | **२७८०** | **५३६२** | | | | |

# ३. आरक्षित गटाचे नांव व विवरण तक्ता तसेच विविध वसाहतीतील आरक्षण निहाय तक्ता (परिशिष्ट - ३ ते ३.४)

## परिशिष्ट - ३

| आरक्षित गटाचे नाव | आरक्षित गटाचे विवरण | आवश्यक प्रमाणपत्र |
|---|---|---|
| **अनुसूचित जाती व नवबौद्ध (SC) (एकूण आरक्षण ११%)** | **अनुसूचित जाती** याचा अर्थ भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४१ खाली, महाराष्ट्र राज्याच्या संबंधात ज्यांना अनुसूचित जाती समजण्यात आले आहे अशा जाती, वंश किंवा जमाती यामधील त्यांचा भाग किंवा गट असा आहे. अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र अथवा जात वैधता संगणकीय प्रमाणपत्र प्रणालीमध्ये नोंदणीवेळी समाविष्ट करणे क्रमप्राप्त आहे. जेणेकरुन संगणकीय प्रणालीमध्ये सादर केलेली माहिती Capture करून पात्रता निश्चिती केली जाईल. | १. महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या अनुसूचित जाती या प्रवर्गामध्ये मोडत असल्याचा जातीचा दाखला (Caste Certificate) देणे बंधनकारक असेल.<br>२.आपण अनुसूचित जाती या प्रवर्गात मोडत असल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात वैधता (Caste Validity) प्रमाणपत्र. |
| **अनुसूचित जमाती (ST) (एकूण आरक्षण ६%)** | **अनुसूचित जमाती** याचा अर्थ भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४२ खाली, महाराष्ट्र राज्याच्या संबंधात, महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही भागात वास्तव्य करुन राहणाऱ्या ज्यांना अनुसूचित जमाती म्हणून समजण्यात येते अशा जमाती किंवा जनजाती समूह असा आहे. अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अथवा जात वैधता प्रमाणपत्र संगणकीय प्रणालीमध्ये नोंदणीवेळी समाविष्ट करणे क्रमप्राप्त आहे. जेणेकरुन संगणकीय प्रणालीमध्ये सादर केलेली माहिती Capture करून पात्रता निश्चिती केली जाईल. | १. महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले अनुसूचित जाती या प्रवर्गामध्ये मोडत असल्याच जातीचा दाखला (Tribes Certificate) देणे बंधनकारक असेल.<br>२. अनुसूचित जमाती या प्रवर्गात मोडत असल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जमात वैधता (Tribes Validity) प्रमाणपत्र. |
| **भटक्या जमाती (NT) (एकूण आरक्षण १.५%)** | ''**भटक्या जमाती**'' याचा अर्थ शासनाने तशी मान्यता दिलेले महाराष्ट्रातील जमाती किंवा जनजाती समूह असा आहे. भटक्या जमाती प्रमाणपत्र संगणकीय प्रणालीमध्ये नोंदणीवेळी समाविष्ट करणे क्रमप्राप्त आहे. जेणेकरुन संगणकीय प्रणालीमध्ये सादर केलेली माहिती Capture करून पात्रता निश्चिती केली जाईल. | १. महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला भटक्या जमाती या प्रवर्गामध्ये मोडत असल्याचा जातीचा दाखला (Caste Certificate) देणे बंधनकारक असेल.<br>२. आपण भटक्या जमाती या प्रवर्गात मोडत असल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र. (Caste Validity Certificate) |
| **विमुक्त जमाती (DT) (एकूण आरक्षण १.५%)** | ''**विमुक्त जमाती**'' याचा अर्थ शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या महाराष्ट्रातील जमाती किंवा जनजाती समूह असा आहे. विमुक्त जमाती प्रमाणपत्र संगणकीय प्रणालीमध्ये नोंदणीवेळी समाविष्ट करणे क्रमप्राप्त आहे. जेणेकरुन संगणकीय प्रणालीमध्ये सादर केलेली माहिती Capture करून पात्रता निश्चिती केली जाईल. | १. महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिकाऱ्याने आपण विमुक्त जमाती या प्रवर्गामध्ये मोडत असल्याचे जातीचा दाखला देणे बंधनकारक असेल.<br>२. आपण विमुक्त जमाती या प्रवर्गात मोडत असल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र. |

| आरक्षित गटाचे नाव | आरक्षित गटाचे विवरण | आवश्यक प्रमाणपत्र |
|---|---|---|
| | शासन परिपत्रक क्र. लोआप्र. ११०९/प्र.क्र.३४९/गृनिभू-१,मंत्रालय,मुंबई दि.०७/०५/२०१० अन्वये म्हाडा अंतर्गत अनुसूचित जाती नवबौध्दांसह, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, विमुक्त जमाती या प्रवर्गातील अर्जदारांना वितरीत करण्यात येणारे गाळे/सदनिकांचा ताबा देण्यापुर्वी संबंधित लाभार्थ्याने जात पडताळणी समितीकडून जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate ) सादर करणे बंधनकारक असेल (ज्या अर्जदारांकडे समितीद्वारे निर्गमित प्रमाणपत्र उपलब्ध असेल अशा प्रमाणपत्रांची पडताळणी Online संगणकीय प्रणालीद्वारे केली जाईल.) व अर्जदाराने सादर केलेले प्रमाणपत्र संबंधित समितीकडे प्रमाणपत्राची वैधता तपासण्यासाठी पाठविण्यात येईल. संबंधित समितीचा अहवाल प्राप्त झाल्या पश्चात अर्जदाराला सदनिकेचा ताबा देण्याची कार्यवाही करण्यात येईल. | |
| **पत्रकार (JR) (एकूण आरक्षण २.५%)** | पत्रकार या प्रवर्गामध्ये जे अर्जदार पत्रकारितेच्या व्यवसायावर अवलंबून आहेत असे व्यक्ती याकरिता **''मुख्य जनसंपर्क अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास प्राधिकरण'' यांनी दिलेले प्रमाणपत्र संगणकीय प्रणालीमध्ये नोंदणीवेळी समाविष्ट करणे क्रमप्राप्त आहे. जेणेकरुन संगणकीय प्रणालीमध्ये सादर केलेली माहिती Capture करून पात्रता निश्चिती केली जाईल.** | मुख्य जनसंपर्क अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा), मुंबई यांचे प्रमाणपत्र |
| **स्वातंत्र्य सैनिक (FF) (एकूण आरक्षण २.५%)** | **''स्वातंत्र्य सैनिक''** याचा अर्थ, भारत सरकार किंवा महाराष्ट्र सरकारकडून मान्य झालेले स्वातंत्र्य सैनिकांसाठी मंजूर झालेली निवृत्ती वेतन मिळणारी व्यक्ती किंवा भारताच्या स्वातंत्र्य मुक्तीच्या राष्ट्रीय चळवळीमध्ये सहभाग असल्याबद्दलचे ताम्रपत्र/सन्मानपत्र बहाल करण्यात आलेली व्यक्ती, किंवा त्यांचे वारसदार (Next-of-Kin) स्वातंत्र्य सैनिकावर अवलंबून असणारी व्यक्ती जसे विधवा वा विधुर साथीदार, वडील/आई, मुलगा, नातु, मुलाची पत्नी, नातवाची पत्नी, यापूर्वी मृत्यु पावलेल्या मुलाची / नातवाची विधवा याबाबत जिल्हाधिकाऱ्यांचे म्हाडाने निश्चित केलेल्या विहित नमुन्यातील प्रमाणपत्र संगणकीय प्रणालीमध्ये नोंदणीवेळी सादर कलेली माहिती Capture करून पात्रता निश्चिती केली जाईल.<br><br>**टिपः** स्वातंत्र्य सैनिक वा त्यांचे पश्चात वरीलप्रमाणे त्यांचे कुटुंबातील घटक व्यक्ती मिळून एकाहून अधिक सदनिका/भूखंडाचा लाभ मिळणार नाही. | मा.जिल्हाधिकारी, यांचे प्रमाणपत्र (प्रमाणपत्राचा नमूना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.) |

| आरक्षित गटाचे नाव | आरक्षित गटाचे विवरण | | आवश्यक प्रमाणपत्र |
|---|---|---|---|
| दिव्यांग (अंध किंवा शारिरीक दृष्ट्या अपंग व्यक्ती) (PH) (Physically Handicapped Person) (एकूण आरक्षण ३%) | अंधत्व पूर्ण (Blindness) | Certificate/UDID Card Issued by https://www.swavlambancard.gov.in स्वावलंबन प्रमाणपत्र संगणकीय प्रणालीमध्ये नोंदणीवेळी समाविष्ट करणे क्रमप्राप्त आहे. जेणेकरुन संगणकीय प्रणालीमध्ये सादर केलेली माहिती Capture करून पात्रता निश्चिती केली जाईल. | https://www.swavlambancard.gov.in द्वारे निर्गमित प्रमाणपत्र/UDID Card |
| | कमी दृष्टी (Low Vision) | | |
| | कुष्ठरोग मुक्त (Leprosy Cured) | | |
| | कर्णबधीर (Hearing Impairment) | | |
| | अवयवातील कमतरता (Locomotor Disability) | | |
| | मतिमंदत्व (Mental Retardation) | | |
| | मनोविकृती (Mental Illness) | | |
| संरक्षण आणि सीमा सुरक्षा दलातील लढाईत मृत झालेल्यांचे कुटुंबिय अथवा जखमी होऊन अपंग झालेले कर्मचारी (DF): (एकूण आरक्षण २%) | या प्रवर्गात संरक्षण दलातील जे कर्मचारी किंवा सीमा भागातील रस्ते बांधणी व विकास मंडळाचे जे कर्मचारी युद्धात जखमी होऊन विकलांग झाले आहेत असे कर्मचारी आणि जे युध्दात शहीद झाले असतील किंवा जे बेपत्ता असल्याचे घोषित केले असतील अशा व्यक्तिंचे कुटुंबिय अर्ज करु शकतात. यासंबधीचे आवश्यक ते म्हाडाने विहित केलेल्या नमुन्यातील प्रमाणपत्र संबंधित जिल्हा सैनिकी अधिकारी, जिल्हा सैनिक कार्यालय यांनी दिलेले प्रमाणपत्र संगणकीय प्रणालीमध्ये नोंदणीवेळी समाविष्ट करणे क्रमप्राप्त आहे. जेणेकरुन संगणकीय प्रणालीमध्ये सादर केलेली माहिती Capture करून पात्रता निश्चिती केली जाईल.<br>**टिप: या प्रवर्गात संरक्षण दलातील जे कर्मचारी किंवा सीमा भागातील रस्ते बांधणी व विकास मंडळाचे जे कर्मचारी युध्दात जखमी होऊन विकलांग झाले आहेत असे कर्मचारी आणि जे युध्दात शहीद झाले असतील किंवा जे बेपत्ता असल्याचे घोषित केले असतील अशा व्यक्तींचे कुटुंबीय त्यांचे कुटुंबातील घटक व्यक्ती मिळून एकाहून अधिक सदनिका/ भूखंडचा लाभ मिळणार नाही.** | | संबंधित जिल्हा सैनिकी अधिकारी, जिल्हा सैनिक कार्यालय यांनी दिलेले प्रमाणपत्र (प्रमाणपत्राचा नमुना संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.) |

| आरक्षित गटाचे नाव | आरक्षित गटाचे विवरण | आवश्यक प्रमाणपत्र |
|---|---|---|
| **माजी सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ति (Ex-Serviceman) (एकूण आरक्षण ५%)** | (अ) **''माजी सैनिक''** याचा अर्थ संघ राज्याच्या सशस्त्र दलातील माजी सदस्य असा आहे. (ज्या व्यक्तीच्या संबंधात सेवा न्यायालयाची कार्यवाही झाल्यानंतर किंवा वाईट चारित्र्यामुळे किंवा दलातून तो निघून गेल्याच्या परिणामी ज्याला काढून टाकण्यात आले असेल किंवा ज्याला अटक केल्याच्या कारणास्तव दलातून काढून टाकण्यात आले आहे अशा माजी सैनिकांचा समावेश या प्रवर्गात होणार नाही.)<br>(ब) माजी सैनिकावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती यांचा अर्थ विवाह साथीदार, मुलगे, अविवाहीत मुली, आई, वडील असा आहे.<br>(क) संबधित जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडून म्हाडाने निश्चित केलेल्या विहित नमुन्यातील प्रमाणपत्र संगणकीय प्रणालीमध्ये नोंदणीवेळी समाविष्ट करणे क्रमप्राप्त आहे. जेणेकरून संगणकीय प्रणालीमध्ये सादर केलेली माहिती Capture करून पात्रता निश्चिती केली जाईल.<br>**टिपः माजी सैनिक वा त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटूंबातील घटक व्यक्ती यांना एकाहून अधिक सदनिकेचा / भुखंडाचा लाभ मिळणार नाही. या प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ सर्वसाधारण राखीव अभियांत्रिकी सेवेतील कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्ती योग्य फेरफारासह घेऊ शकतील. तसेच इतर राज्यातील माजी सैनिक या प्रवर्गांसाठी लाभ घेऊ शकत नाही.** | संबंधित जिल्हा सैनिकी अधिकारी, जिल्हा सैनिक कार्यालय यांनी दिलेले प्रमाणपत्र (प्रमाणपत्राचा नमूना संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.) |
| **महाराष्ट्र राज्यातील मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करणारे, मा.लोकसभा, विधानसभा व विधानपरिषदेचे विद्यमान व माजी सदस्य (MP/MLA/MLC): (एकूण आरक्षण २%)** | अर्जदार कोणत्या मतदार संघातून निवडून आला आणि कोणत्या वर्षी निवडून आला आहे/होता ते प्रमाणित करणारे प्रमाणपत्र म्हाडाने निश्चित केलेल्या विहित नमुन्यातील संबंधित संसद/विधानसभा/विधानपरिषद यांचे मा. सचिवालय यांनी दिलेले प्रमाणपत्र अर्जदारास खालील अटी लागू राहतील.<br>(१) महाराष्ट्र राज्यात कोणत्याही ठिकाणी एक सदनिका किंवा भूखंड प्राप्त करु शकेल.<br>(२) अर्जदार ज्या ठिकाणी प्राधिकरणाने बांधलेली सदनिका किंवा भूखंड प्राप्त करु इच्छित असेल त्या ठिकाणी एखादी सदनिका किंवा भूखंड मालकी तत्वावर किंवा भाडे खरेदी तत्वावर अथवा भाडे तत्वावर त्याच्या/तिच्या कब्जामध्ये नसावा.<br>(३) शासनाकडून किंवा प्राधिकरणाकडून, मिळवलेली एखादी सदनिका अथवा निवासी भूखंड भाडे तत्वावर अथवा लिव्ह ॲण्ड लायसन्सच्या तत्वावर अगोदरच त्यांच्या/तिच्या कब्जात असेल तर त्याने/तिने अशी सदनिका/निवासी भूखंड शासनाकडे किंवा प्रकरण परत्वे प्राधिकरणाकडे परत केली पाहिजे/केले पाहिजेत. | सचिवालय, संसद/विधीमंडळ यांनी दिलेले प्रमाणपत्र<br>(प्रमाणपत्राचा नमूना संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.) |

| आरक्षित गटाचे नाव | आरक्षित गटाचे विवरण | आवश्यक प्रमाणपत्र |
|---|---|---|
| | गाळयासाठी अर्ज करणाऱ्या अर्जदाराने वरील सर्व शर्ती पूर्ण केल्या याची खात्री पटवून देण्याकरीता उपनिर्दिष्ट सर्व शर्ती पूर्ण केल्याच्या पुष्ठ्यार्थ त्यांनी म्हाडाने निश्चित केलेल्या विहित नमुन्यातील प्रमाणपत्र संगणकीय प्रणालीमध्ये नोंदणीवेळी समाविष्ट करणे क्रमप्राप्त आहे. जेणेकरुन संगणकीय प्रणालीमध्ये सादर केलेली माहिती Capture करून पात्रता निश्चिती केली जाईल. | |
| **म्हाडा कर्मचारी (ME) (एकूण आरक्षण २%)** | महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या अधिकारी व कर्मचारी ज्यांची म्हाडामध्ये सलग कायम आस्थापनेवर ०५ वर्षे सेवा झाली आहे असे अर्जदार या संवर्गात सदनिका मिळण्यासाठी पात्र ठरतील. प्रतिनियुक्तीवरील अधिकारी/कर्मचारी व त्याचप्रमाणे शिकाऊ उमेदवार, तात्पुरती भरती केलेला नोकरवर्ग आणि ज्यांना महाराष्ट्र राज्यामध्ये कोठेही यापूर्वी या आरक्षणाखाली जागा मिळालेली आहे व त्याचप्रमाणे कर्मचारी कल्याण योजनेअंतर्गत निर्माण झालेल्या संस्थांचे जे सदस्य आहेत तसेच ज्या कर्मचाऱ्यांना सेवानिवासस्थाने मालकीतत्वावर देण्यात आली आहेत त्यांना या प्रवर्गामध्ये गाळयासाठी अर्ज करता येणार नाही. प्रणालीमध्ये नोंदणीवेळी प्राधिकरणाद्वारे दिलेले कर्मचारी क्रमांक नमूद ओळखपत्र समाविष्ट करणे क्रमप्राप्त आहे. जेणेकरुन संगणकीय प्रणालीमध्ये सादर केलेली माहिती Capture करून पात्रता निश्चिती केली जाईल. | प्राधिकरणाद्वारे दिलेले कर्मचारी क्रमांक **(Employee Code)** नमूद ओळखपत्र |
| **राज्य शासनाचे व राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील संविधानिक मंडळ, महामंडळे इ. चे कर्मचारी तसेच अगोदर निवृत्त झालेले कर्मचारी (SG) (एकूण आरक्षण ५%)** | राज्य शासनाचे व राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील संविधानिक मंडळे, महामंडळाचे कर्मचारी यांची कायम आस्थापनेवर अर्जदाराची कमीत कमी ०५ वर्षे सेवा झालेली असावी. असे कर्मचारी/ सेवानिवृत्त कर्मचारी यांना त्यांच्या खात्याचे म्हाडाने निश्चित केलेले विहित नमुन्यातील प्रमाणपत्र संगणकीय प्रणालीमध्ये नोंदणीवेळी समाविष्ट करणे क्रमप्राप्त आहे. जेणेकरुन संगणकीय प्रणालीमध्ये सादर केलेली माहिती Capture करून पात्रता निश्चिती केली जाईल. या प्रवर्गात महानगरपालिका, नगरपरिषद व जिल्हापरिषद तसेच अनुदानित/ विनाअनुदानित शैक्षणिक/अशैक्षणिक संस्था यांचे कर्मचारी हे स्थानिक स्वराज्य संस्थाचे कर्मचारी असल्यामुळे या आरक्षित गटाकरीता अर्ज करण्यास पात्र नसतील. | अर्जदार ज्या आस्थेपनेवर कार्यरत आहे/सेवानिवृत्त झाले आहे. त्या आस्थेपनेवरील सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र (प्रमाणपत्राचा नमूना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.) |
| **शासकीय निवासस्थानात राहणारे आणि जे तीन वर्षात सेवानिवृत्त होणार आहेत किंवा अगोदरच सेवानिवृत्त झाले असतील असे केंद्र शासनाचे कर्मचारी (CG): (एकूण आरक्षण २%)** | अ. या प्रवर्गातील अर्जदाराला, त्यांच्या सबंधित अधिकाऱ्यांकडून तो ३ वर्षांच्या कालावधीत सेवानिवृत्त होणार असल्याचे आणि तो कर्मचारी महाराष्ट्र राज्यातील सेवा निवासस्थानात राहात असल्याचे प्रमाणपत्र मिळवावे लागेल जे पुर्वीच सेवानिवृत्त झाले असतील त्यांना देखील या प्रवर्गाचा लाभ घेता येईल. जाहिरात प्रसिध्द झाल्याचा दिनांक हा सेवानिवृत्तीच्या पूर्वीचा ३ वर्षांचा कालावधी ग्राहय धरला जाईल. | अर्जदार ज्या आस्थेपनेवर कार्यरत आहे/सेवानिवृत्त झाले आहे. त्या आस्थेपनेवरील सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र (प्रमाणपत्राचा नमूना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.) |

| आरक्षित गटाचे नाव | आरक्षित गटाचे विवरण | आवश्यक प्रमाणपत्र |
|---|---|---|
| | ब. **नियत वयोमान झाल्यानंतर ३ वर्षांमध्ये निवृत्त होणाऱ्या व्यक्तींकरिताच केवळ ही सवलत आहे. स्वेच्छेने निवृत्त झालेल्या केंद्र शासनाच्या कर्मचाऱ्यांसाठी ह्या प्रवर्गाचा लाभ घेता येणार नाही.**<br>क. ३ वर्षांमध्ये निवृत्त होणारे जे कर्मचारी महाराष्ट्र राज्यातील त्यांना वितरीत केलेल्या शासकीय निवासस्थानात राहत नाहीत अश्या कर्मचाऱ्यांना या आरक्षित गटाचा लाभ घेता येणार नाही.<br>ड. जे अर्जदार ३ वर्षांत सेवानिवृत्त होणार आहेत व ते महाराष्ट्रामध्ये सेवेत आहेत अशा केंद्रीय कर्मचाऱ्यांनाच ह्याचा लाभ घेता येईल.<br>ई. यासाठी म्हाडाने निश्चित केलेले नमुन्यातील प्रमाणपत्र संगणकीय प्रणालीमध्ये नोंदणीवेळी समाविष्ट करणे क्रमप्राप्त आहे. जेणेकरुन संगणकीय प्रणालीमध्ये सादर केलेली माहिती Capture करून पात्रता निश्चिती केली जाईल. | |
| **कलाकार (AR):**<br>**(एकूण आरक्षण २%)** | चित्रपट/दुरदर्शन/नाटक/तमाशा/आकाशवाणी/ चित्रकार/मुर्तिकार/क्राफ्टमन/संगितकार/नृत्य इ. क्षेत्रातील कलाकर व्यक्ती संपूर्णपणे कलादर्शनातून व कला व्यवसायातून होणाऱ्या प्राप्तीवर निर्भर असून त्यावरच प्रामुख्याने त्याची उपजिवीका अवलंबून आहे. अशाच व्यक्ती कलाकार या प्रवर्गासाठी अर्ज करण्यास पात्र आहेत. उपजिविकेकरिता इतर व्यवसायावर अवलंबून असून फावल्या वेळी कलेची उपासना, छंद व व्यासंग म्हणून कलेची जोपासना करणारी व्यक्ती या प्रवर्गासाठी पात्र नाही. **कलाकार या प्रवर्गासाठी अर्ज करणाऱ्या अर्जदाराने महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक संचालनालय किंवा महाराष्ट्र राज्य कला संचालनालय कडून म्हाडाने निश्चित केलेल्या विहित नमुन्यातील प्रमाणपत्र** संगणकीय प्रणालीमध्ये नोंदणीवेळी समाविष्ट करणे क्रमप्राप्त आहे. जेणेकरुन संगणकीय प्रणालीमध्ये सादर केलेली माहिती Capture करून पात्रता निश्चिती केली जाईल. | महाराष्ट्र राज्य **सांस्कृतिक** संचालनालय / महाराष्ट्र राज्य कला संचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी दिलेले प्रमाणपत्र |
| **शासन स्वेच्छा निर्णया खालील आरक्षण**<br>**(एकूण आरक्षण २%)** | मा.न्यायालयाच्या आदेशानुसार या प्रवर्गास स्थगिती असल्याने सदर प्रवर्गातील सदनिका सर्वसाधारण जनता या प्रवर्गासाठी आरक्षित करण्यात आलेल्या आहेत. | |
| **सर्वसाधारण जनता (GP):**<br>**(एकूण आरक्षण ५०%)** | महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास (जमिनीचे वाटप) विनियम १९८१ मधील नियम १३ व महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास (मिळकत व्यवस्थापन, गाळयांची विक्री, हस्तांतरण व अदलाबदल) विनियम १९८१ मधील नियम १६ मध्ये अंतर्भूत असलेले आरक्षित गट/प्रवर्ग वगळून प्रस्तुत योजनेतील ५०% सदनिका या सर्वसाधारण जनतेसाठी उपलब्ध असतील. | |

### विविध वसाहतीतील सदनिकांचा आरक्षणनिहाय तक्ता (परिशिष्ठ क्र. ३.१ ते ३.४)

## परिशिष्ट - ३.१

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीची विल्हेवाट) विनियम १९८१ मधील नियमानुसार निरनिराळया प्रवर्गासाठी संकेतनिहाय, प्रवर्गनिहाय उपलब्ध होणाऱ्या सदनिकांची आरक्षण निहाय संख्या दर्शविणारा तक्ता**

| आरक्षण प्रवर्गाचा तपशील | संकेत क्र. ३८७-अ | संकेत क्र. ३८८-अ | संकेत क्र. ३९६-अ | संकेत क्र. ४००-अ | संकेत क्र. ४०१-अ | संकेत क्र. ४०२-अ | संकेत क्र. ४०४-अ | संकेत क्र. ४०५-अ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| अनुसुचित जाती आणि नवबौध्द (SC) | १ | 0 | १ | २ | 0 | 0 | 0 | 0 |
| अनुसूचित जमाती (ST) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| भटक्या जमाती (NT) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| विमुक्त जमाती (DT) | 0 | 0 | १ | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| पत्रकार (JR) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| स्वातंत्र्य सैनिक (FF) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| अंध व शारिरिक दृष्टया अपंग (PH) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | १ | १ |
| संरक्षण दलातील किंवा सीमा सुरक्षा दलातील लढाईत मृत झालेल्या सैनिकांचे नातेवाईक अथवा जखमी होऊन अपंग झालेले कर्मचारी (DF) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | १ |
| माजी सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती (EX) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| महाराष्ट्रातील मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करणारे संसदेचे, विधानसभेचे व विधानपरिषदेचे आजी माजी सदस्य (MP/MLA/MLC) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | १ |
| म्हाडा कर्मचारी (ME) | 0 | 0 | १ | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| राज्य शासकीय कर्मचारी आणि संबंधित मंडळ, महामंडळे इत्यादींचे कर्मचारी यात यापूर्वी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. (SG) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | १ | 0 |
| शासकीय निवासस्थानामध्ये राहणारे आणि जे तीन वर्षात सेवानिवृत्त होणार आहेत किंवा अगोदरच सेवानिवृत्त झाले असतील असे केंद्र सरकारचे कर्मचारी (CG) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | १ | १ |
| चित्रपट, दूरदर्शन, नाटक, तमाशा, आकाशवाणी या माध्यमातील कलाकार तसेच परफॉर्मींग आर्टसशी संबंधित असलेले कलाकार यामध्ये चित्रकार, शिल्पकार, गवई (गायन व वाद्य) नर्तक, कारागीर, कवी, कव्वाल व नकलाकार यांचा समावेश आहे. (AR) | 0 | 0 | १ | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **सर्वसाधारण जनता (GP)** | 0 | २ | ६ | ३ | १ | २ | २ | ३ |
| **एकूण सदनिका** | १ | २ | १० | ५ | १ | २ | ५ | ७ |

**विविध वसाहतीतील सदनिकांचा आरक्षणनिहाय तक्ता (परिशिष्ठ क्र. ३.१ ते ३.४)**

## परिशिष्ट - ३.२

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीची विल्हेवाट) विनियम १९८१ मधील नियमानुसार निरनिराळया प्रवर्गासाठी संकेतनिहाय, प्रवर्गनिहाय उपलब्ध होणाऱ्या सदनिकांची आरक्षण निहाय संख्या दर्शविणारा तक्ता**

| आरक्षण प्रवर्गाचा तपशील | संकेत क्र. ४०७-अ | संकेत क्र. ४०८-अ | संकेत क्र. ४०९-अ | संकेत क्र. ४१०-अ | संकेत क्र. ४१६ | संकेत क्र. ४१७ | संकेत क्र. ४१८ | संकेत क्र. ४१९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| अनुसुचित जाती आणि नवबौध्द (SC) | २ | ० | २ | ० | १२ | २ | ० | २ |
| अनुसूचित जमाती (ST) | १ | ० | २ | ० | ७ | १ | ० | १ |
| भटक्या जमाती (NT) | ० | ० | १ | ० | २ | १ | ० | ० |
| विमुक्त जमाती (DT) | १ | ० | ० | ० | २ | ० | ० | ० |
| पत्रकार (JR) | ० | ० | १ | ० | ३ | १ | ० | १ |
| स्वातंत्र्य सैनिक (FF) | ० | ० | १ | ० | ३ | १ | ० | १ |
| अंध व शारिरिक दृष्टया अपंग (PH) | १ | ० | १ | ० | ३ | १ | ० | १ |
| संरक्षण दलातील किंवा सीमा सुरक्षा दलातील लढाईत मृत झालेल्या सैनिकांचे नातेवाईक अथवा जखमी होऊन अपंग झालेले कर्मचारी (DF) | १ | ० | १ | ० | २ | ० | ० | ० |
| माजी सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती (EX) | ० | ० | २ | ० | ६ | १ | ० | १ |
| महाराष्ट्रातील मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करणारे संसदेचे, विधानसभेचे व विधानपरिषदेचे आजी माजी सदस्य (MP/MLA/MLC) | ० | ० | १ | ० | २ | ० | ० | ० |
| म्हाडा कर्मचारी (ME) | १ | ० | १ | ० | २ | ० | ० | ० |
| राज्य शासकीय कर्मचारी आणि संबंधित मंडळ, महामंडळे इत्यादींचे कर्मचारी यात यापूर्वी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. (SG) | ० | ० | २ | ० | ६ | १ | ० | १ |
| शासकीय निवासस्थानामध्ये राहणारे आणि जे तीन वर्षात सेवानिवृत्त होणार आहेत किंवा अगोदरच सेवानिवृत्त झाले असतील असे केंद्र सरकारचे कर्मचारी (CG) | ० | ० | ० | ० | २ | ० | ० | ० |
| चित्रपट, दूरदर्शन, नाटक, तमाशा, आकाशवाणी या माध्यमातील कलाकार तसेच परफॉर्मींग आर्टसशी संबंधित असलेले कलाकार यामध्ये चित्रकार, शिल्पकार, गवई (गायन व वाद्य) नर्तक, कारागीर, कवी, कव्वाल व नकलाकार यांचा समावेश आहे. (AR) | १ | ० | ० | ० | २ | ० | ० | ० |
| **सर्वसाधारण जनता (GP)** | **६** | **४** | **१५** | **२** | **५८** | **९** | **२** | **९** |
| **एकूण सदनिका** | **१४** | **४** | **३०** | **२** | **११२** | **१८** | **२** | **१७** |

### विविध वसाहतीतील सदनिकांचा आरक्षणनिहाय तक्ता (परिशिष्ठ क्र. ३.१ ते ३.४)

## परिशिष्ट - ३.३

### महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीची विल्हेवाट) विनियम १९८१ मधील नियमानुसार निरनिराळया प्रवर्गासाठी संकेतनिहाय, प्रवर्गनिहाय उपलब्ध होणाऱ्या सदनिकांची आरक्षण निहाय संख्या दर्शविणारा तक्ता

| आरक्षण प्रवर्गाचा तपशील | संकेत क्र. ४२० | संकेत क्र. ४२१ | संकेत क्र. ४२२ | संकेत क्र. ४२३ | संकेत क्र. ४२४ | संकेत क्र. ४२५ | संकेत क्र. ४२६ | संकेत क्र. ४२७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ |
| अनुसुचित जाती आणि नवबौध्द (SC) | २ | ४ | ६ | २ | २ | ३ | १ | ३ |
| अनुसूचित जमाती (ST) | १ | २ | ३ | १ | १ | १ | १ | २ |
| भटक्या जमाती (NT) | १ | ० | १ | ० | १ | ० | ० | १ |
| विमुक्त जमाती (DT) | ० | १ | १ | ० | ० | १ | ० | ० |
| पत्रकार (JR) | १ | १ | १ | १ | १ | १ | ० | १ |
| स्वातंत्र्य सैनिक (FF) | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ |
| अंध व शारीरिक दृष्टया अपंग (PH) | १ | १ | २ | १ | १ | १ | ० | १ |
| संरक्षण दलातील किंवा सीमा सुरक्षा दलातील लढाईत मृत झालेल्या सैनिकांचे नातेवाईक अथवा जखमी होऊन अपंग झालेले कर्मचारी (DF) | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | १ |
| माजी सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती (EX) | १ | २ | ३ | १ | १ | १ | १ | १ |
| महाराष्ट्रातील मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करणारे संसदेचे, विधानसभेचे व विधानपरिषदेचे आजी माजी सदस्य (MP/MLA/MLC) | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | ० |
| म्हाडा कर्मचारी (ME) | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | १ |
| राज्य शासकीय कर्मचारी आणि संबंधित मंडळ, महामंडळे इत्यादींचे कर्मचारी यात यापूर्वी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. (SG) | १ | २ | ३ | १ | १ | १ | १ | १ |
| शासकीय निवासस्थानामध्ये राहणारे आणि जे तीन वर्षात सेवानिवृत्त होणार आहेत किंवा अगोदरच सेवानिवृत्त झाले असतील असे केंद्र सरकारचे कर्मचारी (CG) | ० | १ | १ | ० | १ | ० | ० | १ |
| चित्रपट, दूरदर्शन, नाटक, तमाशा, आकाशवाणी या माध्यमातील कलाकार तसेच परफॉर्मींग आर्टसशी संबंधित असलेले कलाकार यामध्ये चित्रकार, शिल्पकार, गवई (गायन व वाद्य) नर्तक, कारागीर, कवी, कव्वाल व नकलाकार यांचा समावेश आहे. (AR) | ० | १ | १ | ० | ० | १ | ० | ० |
| **सर्वसाधारण जनता (GP)** | **९** | **१८** | **३०** | **९** | **११** | **१२** | **५** | **१४** |
| **एकूण सदनिका** | **१८** | **३७** | **५६** | **१७** | **२१** | **२३** | **१०** | **२८** |

**विविध वसाहतीतील सदनिकांचा आरक्षणनिहाय तक्ता (परिशिष्ठ क्र. ३.१ ते ३.४)**

## परिशिष्ट - ३.४

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीची विल्हेवाट) विनियम १९८१ मधील नियमानुसार निरनिराळया प्रवर्गासाठी संकेतनिहाय, प्रवर्गनिहाय उपलब्ध होणाऱ्या सदनिकांची आरक्षण निहाय संख्या दर्शविणारा तक्ता**

| आरक्षण प्रवर्गाचा तपशील | संकेत क्र. ४२८ | संकेत क्र. ४२९ | संकेत क्र. ४३० | संकेत क्र. ४३१ | संकेत क्र. ४३२ | संकेत क्र. ४३३ | संकेत क्र. ४१४-अ | संकेत क्र. ४१५-अ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **२५** | **२६** | **२७** | **२८** | **२९** | **३०** | **३१** | **३२** |
| अनुसुचित जाती आणि नवबौध्द (SC) | १ | १ | ४ | ४ | १ | ३ | १५ | ३४ |
| अनुसूचित जमाती (ST) | १ | 0 | २ | २ | १ | २ | १0 | १७ |
| भटक्या जमाती (NT) | 0 | 0 | १ | 0 | 0 | 0 | ३ | ६ |
| विमुक्त जमाती (DT) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | २ | ४ |
| पत्रकार (JR) | 0 | 0 | १ | १ | 0 | १ | ४ | ७ |
| स्वातंत्र्य सैनिक (FF) | 0 | 0 | १ | १ | 0 | १ | ४ | ११ |
| अंध व शारीरिक दृष्टया अपंग (PH) | १ | १ | १ | १ | १ | १ | २ | ७ |
| संरक्षण दलातील किंवा सीमा सुरक्षा दलातील लढाईत मृत झालेल्या सैनिकांचे नातेवाईक अथवा जखमी होऊन अपंग झालेले कर्मचारी (DF) | 0 | 0 | १ | १ | 0 | १ | २ | ७ |
| माजी सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती (EX) | १ | 0 | २ | २ | १ | १ | ५ | १८ |
| महाराष्ट्रातील मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करणारे संसदेचे, विधानसभेचे व विधानपरिषदेचे आजी माजी सदस्य (MP/MLA/MLC) | 0 | 0 | १ | १ | 0 | १ | ३ | ४ |
| म्हाडा कर्मचारी (ME) | १ | 0 | १ | १ | 0 | १ | ३ | ६ |
| राज्य शासकीय कर्मचारी आणि संबंधित मंडळ, महामंडळे इत्यादींचे कर्मचारी यात यापूर्वी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. (SG) | १ | 0 | २ | २ | १ | १ | ९ | १५ |
| शासकीय निवासस्थानामध्ये राहणारे आणि जे तीन वर्षात सेवानिवृत्त होणार आहेत किंवा अगोदरच सेवानिवृत्त झाले असतील असे केंद्र सरकारचे कर्मचारी (CG) | 0 | १ | १ | १ | 0 | 0 | ३ | ६ |
| चित्रपट, दूरदर्शन, नाटक, तमाशा, आकाशवाणी या माध्यमातील कलाकार तसेच परफॉर्मींग आर्टसशी संबंधित असलेले कलाकार यामध्ये चित्रकार, शिल्पकार, गवई (गायन व वाद्य) नर्तक, कारागीर, कवी, कव्वाल व नकलाकार यांचा समावेश आहे. (AR) | 0 | 0 | १ | १ | 0 | 0 | ३ | ११ |
| **सर्वसाधारण जनता (GP)** | **६** | **३** | **१८** | **१४** | **५** | **१३** | **७३** | **२७९** |
| **एकूण सदनिका** | **१२** | **६** | **३७** | **३२** | **१०** | **२६** | **१४१** | **४३२** |

### विविध वसाहतीतील सदनिकांचा आरक्षणनिहाय तक्ता (परिशिष्ठ क्र. ३.१ ते ३.४)

## परिशिष्ट - ३.५

### महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीची विल्हेवाट) विनियम १९८१ मधील नियमानुसार निरनिराळया प्रवर्गासाठी संकेतनिहाय, प्रवर्गनिहाय उपलब्ध होणाऱ्या सदनिकांची आरक्षण निहाय संख्या दर्शविणारा तक्ता

| आरक्षण प्रवर्गाचा तपशील | संकेत क्र. ४३४ | संकेत क्र. ११७-ड | संकेत क्र. ११८-ड | संकेत क्र. २५४-क | संकेत क्र. २५५-क | संकेत क्र. २६५-ब | संकेत क्र. २६६-ब | संकेत क्र. २७६-क |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ३३ | ३४ | ३५ | ३६ | ३७ | ३८ | ३९ | ४० |
| अनुसुचित जाती आणि नवबौध्द (SC) | २६७ | ० | ० | २ | ० | ३ | ० | ५ |
| अनुसूचित जमाती (ST) | १४६ | १ | १ | १ | ० | १ | १ | ५ |
| भटक्या जमाती (NT) | ३६ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| विमुक्त जमाती (DT) | ३६ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| पत्रकार (JR) | ६१ | ० | ० | १ | ० | ० | १ | १ |
| स्वातंत्र्य सैनिक (FF) | ६१ | ० | ० | ० | २ | ० | ० | २ |
| अंध व शारीरिक दृष्टया अपंग (PH) | ७३ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| संरक्षण दलातील किंवा सीमा सुरक्षा दलातील लढाईत मृत झालेल्या सैनिकांचे नातेवाईक अथवा जखमी होऊन अपंग झालेले कर्मचारी (DF) | ४९ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| माजी सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती (EX) | १२२ | ० | ० | ० | ० | ४ | २ | १ |
| महाराष्ट्रातील मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करणारे संसदेचे, विधानसभेचे व विधानपरिषदेचे आजी माजी सदस्य (MP/MLA/MLC) | ४९ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| म्हाडा कर्मचारी (ME) | ४९ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| राज्य शासकीय कर्मचारी आणि संबंधित मंडळ, महामंडळे इत्यादींचे कर्मचारी यात यापूर्वी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. (SG) | १२२ | ० | ० | २ | ० | ० | ० | ० |
| शासकीय निवासस्थानामध्ये राहणारे आणि जे तीन वर्षात सेवानिवृत्त होणार आहेत किंवा अगोदरच सेवानिवृत्त झाले असतील असे केंद्र सरकारचे कर्मचारी (CG) | ४९ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| चित्रपट, दूरदर्शन, नाटक, तमाशा, आकाशवाणी या माध्यमातील कलाकार तसेच परफॉर्मींग आर्टसशी संबंधित असलेले कलाकार यामध्ये चित्रकार, शिल्पकार, गवई (गायन व वाद्य) नर्तक, कारागीर, कवी, कव्वाल व नकलाकार यांचा समावेश आहे. (AR) | ४९ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **सर्वसाधारण जनता (GP)** | **१२६०** | **१** | **१** | **११** | **१** | **१३** | **१३** | **९** |
| **एकूण सदनिका** | **२४२९** | **२** | **२** | **१७** | **३** | **२१** | **१८** | **२८** |

**विविध वसाहतीतील सदनिकांचा आरक्षणनिहाय तक्ता (परिशिष्ठ क्र. ३.१ ते ३.४)**

## परिशिष्ट - ३.६

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीची विल्हेवाट) विनियम १९८१ मधील नियमानुसार निरनिराळया प्रवर्गासाठी संकेतनिहाय, प्रवर्गनिहाय उपलब्ध होणाऱ्या सदनिकांची आरक्षण निहाय संख्या दर्शविणारा तक्ता**

| आरक्षण प्रवर्गाचा तपशील | संकेत क्र. ३५३-क | संकेत क्र. ४१२-अ | संकेत क्र. ४१३-अ | संकेत क्र. ४३५ | संकेत क्र. ४३६ | संकेत क्र. ५-अ | संकेत क्र. २५३-ब | संकेत क्र. ४३७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ४१ | ४२ | ४३ | ४४ | ४५ | ४६ | ४७ | ४८ |
| अनुसुचित जाती आणि नवबौध्द (SC) | ० | ५७ | ० | १० | ९६ | ० | ८ | ५ |
| अनुसूचित जमाती (ST) | ० | ३२ | ० | ६ | ५२ | ० | ७ | २ |
| भटक्या जमाती (NT) | ० | ८ | ० | १ | १३ | ० | ० | १ |
| विमुक्त जमाती (DT) | ० | ८ | ० | १ | १३ | ० | १ | ० |
| पत्रकार (JR) | ५१ | १३ | ५३ | २ | २२ | ० | ३ | १ |
| स्वातंत्र्य सैनिक (FF) | ० | १३ | ० | २ | २२ | ० | २ | १ |
| अंध व शारीरिक दृष्टया अपंग (PH) | ० | १६ | ० | ३ | २६ | ० | ० | १ |
| संरक्षण दलातील किंवा सीमा सुरक्षा दलातील लढाईत मृत झालेल्या सैनिकांचे नातेवाईक अथवा जखमी होऊन अपंग झालेले कर्मचारी (DF) | ० | ११ | ० | २ | १७ | ० | १ | १ |
| माजी सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती (EX) | ० | २५ | ० | ४ | ४४ | ० | ४ | २ |
| महाराष्ट्रातील मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करणारे संसदेचे, विधानसभेचे व विधानपरिषदेचे आजी माजी सदस्य (MP/MLA/MLC) | ० | ११ | ० | २ | १७ | ० | २ | १ |
| म्हाडा कर्मचारी (ME) | ० | ११ | ० | २ | १७ | ० | १ | १ |
| राज्य शासकीय कर्मचारी आणि संबंधित मंडळ, महामंडळे इत्यादींचे कर्मचारी यात यापूर्वी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. (SG) | ० | २६ | ० | ४ | ४४ | ० | ६ | २ |
| शासकीय निवासस्थानामध्ये राहणारे आणि जे तीन वर्षात सेवानिवृत्त होणार आहेत किंवा अगोदरच सेवानिवृत्त झाले असतील असे केंद्र सरकारचे कर्मचारी (CG) | ० | ११ | ० | २ | १७ | ० | २ | १ |
| चित्रपट, दूरदर्शन, नाटक, तमाशा, आकाशवाणी या माध्यमातील कलाकार तसेच परफॉर्मींग आर्टसशी संबंधित असलेले कलाकार यामध्ये चित्रकार, शिल्पकार, गवई (गायन व वाद्य) नर्तक, कारागीर, कवी, कव्वाल व नकलाकार यांचा समावेश आहे. (AR) | ० | ११ | ० | २ | १७ | ० | २ | १ |
| **सर्वसाधारण जनता (GP)** | **०** | **२७२** | **०** | **४५** | **४५२** | **१** | **३७** | **२१** |
| **एकूण सदनिका** | **५१** | **५२५** | **५३** | **८८** | **८६९** | **१** | **७६** | **४१** |

# ४. पात्रतेच्या अटी व शर्ती

**ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी अर्जदारांनी संपुर्ण माहिती पुस्तिका काळजीपूर्वक वाचावी.**

कोंकण मंडळाच्या सदनिकांच्या विक्रीसाठी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास (जमिनीचे वाटप) नियम १९८१ व महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळयांची विक्री, हस्तांतरण व अदलाबदल) विनियम १९८१ यामधील तरतूदी अनुसार व वेळोवेळी लागू होणारे नियम/आदेश/परिपत्रकांच्या तरतूदींच्या अधीन राहून इच्छुक अर्जदारांकडून सदनिकांच्या विक्री करिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

४.१ अर्ज सादर करावयाच्या दिवशी अर्जदाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी नसावे.

४.२. अर्जदार किंवा त्यांची पत्नी/पती किंवा त्यांची अज्ञान मुले यांच्या नावावर मालकी तत्वावर, भाडे खरेदी पध्दतीवर अथवा नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थेचा सदस्य म्हणून अर्जदार ज्या महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषद/ग्रामपंचायत (स्थानिक प्राधिकरण) हद्दीतील गृहनिर्माण योजनेमध्ये अर्ज करणार आहे त्या महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषद/ग्रामपंचायत (स्थानिक प्राधिकरण) हद्दीतील म्हाडाने वितरीत केलेला किंवा खाजगीरित्या संपादित केलेला निवासी गाळा/निवासी भुखंड नसावा या संबंधीची म्हाड विनियमातील तरतूद खालीप्रमाणे आहे.

Regulation 9 (A) - A person shall not be eligible to apply for any tenements in Municipal area if he or his / her spouse or his / her minor children own a house or a flat or a residential plot of land or holds on a hire - purchase basis or outright sale basis or on a rental basis from the Maharashtra Housing and Area Development Authority a house or a flat or a residential plot of land in his / her name or in the name of his / her minor children as the case may be, in such a Municipal area.

ii) Also a person, his/her spouse who had got the tenements of the Board or in the scheme of Central or State Govt. in past, would not be eligible to participate in the advertisement for sale. Provided that Authority by its resolution may exempt any particular class of applicant from the condition.

४.३ अर्जदाराने जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून मागील सलग २० वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागामध्ये अर्जदाराचे किमान १५ वर्षे सलग वास्तव्य असल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले महाराष्ट्रातील अधिवासाचे प्रमाणपत्र (Certificate of Age, Nationality and Domicile) संगणकीय प्रणालीव्दारे ग्राह्य ठरला जाईल / Capture केली जाईल, केंद्रशासन कर्मचारी (CG) प्रवर्गाकरिता सदर अट शिथील राहिल. इतर कोणताही पुरावा अधिवास प्रमाणपत्र म्हणून संगणकीय प्रणालीव्दारे ग्राह्य ठरली जाणार नाही / Capture केली जाणार नाही, याची संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज भरताना विशेष नोंद घ्यावी.

४.४ **दिनांक ०१/०४/२०२३ ते ३१/०३/२०२४ या कालावधीतील अर्जदाराचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न विविध उत्पन्न गटासाठी खाली दर्शविल्याप्रमाणे असावे. ''कौटुंबिक वार्षिक उत्पन्न'' म्हणजे अर्जदाराचे स्वतःचे एकट्याचे व त्यांची पत्नी/पती यांची मासिक प्राप्ती असल्यास दोघांचे मिळून नोकरीद्वारे अथवा उद्योग व्यवसायापासून, जीवितार्थाचे सर्वसाधारण साधन म्हणून दिनांक ०१/०४/२०२३ ते ३१/०३/२०२४ या कालावधीत झालेल्या उत्पन्नाच्या प्राप्तीवरुन आयकर विवरण पत्र अथवा तहसिलदाराचा उत्पन्नाचा दाखला उत्पन्न स्तोत्र म्हणून** संगणकीय प्रणालीद्वारे ग्राह्य ठरली जाईल / केली जाईल, दिनांक ०१/०४/२०२३ ते ३१/०३/२०२४ (Assesment Year २०२४-२५) मधील आयकर

विवरण पत्र अथवा दिनांक ०१/०४/२०२३ ते ३१/०३/२०२४ तहसिलदाराचा उत्पन्नाचा दाखला या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही स्वरुपाचा उत्पन्न स्तोत्राबाबतची कागदपत्रे/दाखले/पुरावे/ प्रतिज्ञापत्र / वेतनप्रमाणपत्र इ. संगणकीय प्रणालीद्वारे ग्राह्य धरली जाणार नाही/Capture केली जाणार नाही, संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज भरताना विशेष नोंद घ्यावी तसेच कौटुंबिक उत्पन्नाचा दाखला हा अर्जदाराच्या नावे असणे बंधनकारक आहे.

- **उत्पन्न मर्यादा**

**१५ % एकात्मिक व २०% सर्व समावेशक योजना व कोंकण मंडळ योजनेकरिता अर्जदाराचे** दिनांक ०१/०४/२०२३ ते ३१/०३/२०२४ (Assesment Year - २०२४-२५) मधील आयकर विवरण पत्र अथवा दिनांक ०१/०४/२०२३ ते ३१/०३/२०२४ तहसिलदाराचा उत्पन्नाचा दाखल्यामधील कौटुंबिक उत्पन्न हे शासन निर्णय क्र. प्रआयो-२०१९/प्र.क्र.१२६/गृनिधो-२, दि.१६/०३/२०२३ अन्वये अत्यल्प उत्पन्न गट (EWS) / अल्प उत्पन्न गट (LIG) / मध्यम उत्पन्न गट (MIG)/उच्च उत्पन्न गट (HIG) या प्रवर्गाकरिता अनुज्ञेय चटई क्षेत्रफळ व उत्पन्न मर्यादा खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | उत्पन्न गट | सुधारित कमाल उत्पन्न मर्यादा (रूपये वार्षिक) | | |
|---|---|---|---|---|
| | | मुंबई महानगर क्षेत्र, पूणे महानगर क्षेत्र, नागपूर महानगर क्षेत्र, नागपूर सुधार प्रन्यास प्रदेश तसेच १० लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेली स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत क्षेत्र | उर्वरित महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत क्षेत्र | अनुज्ञेय क्षेत्रफळ Carpet Area |
| १ | अत्यल्प उत्पन्न गट (EWS) | ₹ ६,००,०००/- पर्यंत | ₹ ४,५०,०००/- पर्यंत | ३० चौ.मी.पर्यंत |
| २ | अल्प उत्पन्न गट (LIG) | ₹ ९,००,०००/- पर्यंत | ₹ ७,५०,०००/- पर्यंत | ६० चौ.मी.पर्यंत |
| ३ | मध्यम उत्पन्न गट (MIG) | ₹ १२,००,०००/- पर्यंत | ₹ १२,००,०००/- पर्यंत | ९० चौ.मी.पर्यंत |
| ४ | उच्च उत्पन्न गट (HIG) | कमाल मर्यादा नाही | कमाल मर्यादा नाही | ९० चौ.मी.वरील |

**टिपः या शासन निर्णयानुसार उपरोक्त ४ ही उत्पन्न गटासाठी किमान मर्यादा निश्चित करण्यात आली नसली तरी,** १) अत्यल्प उत्पन्न गटातील व्यक्ती अत्यल्प व अल्प उत्पन्न गटासाठी अर्ज करू शकतात. २) अल्प उत्पन्न गटातील व्यक्ती अल्प व मध्यम उत्पन्न गटासाठी अर्ज करू शकतात. ३) मध्यम उत्पन्न गटातील व्यक्ती मध्यम व उच्च उत्पन्न गटासाठी अर्ज करू शकतात. ४) उच्च उत्पन्न गटातील व्यक्ती केवळ उच्च उत्पन्न गटासाठी अर्ज करू शकतात.

**४.५** द नॅशनल ट्रस्ट फॉर द वेल्फेअर फॉर पर्सन्स विथ ऑटिस्म, सिरेब्रल पालसी, मेन्टल रिटार्डेशन ॲन्ड डिसॅबिलिटिज, ॲक्ट १९९९ मधील प्रकरण ६ मधील कलम १३ ते १७ मधील तरतूदींच्या अधीन राहून गतीमंद (Mental Retarded) व मनोविकृत (Mental Illness) अर्जदारांच्या वतीने संबंधीत व्यक्ती/संस्था अर्ज करु शकतील व या स्वरुपाचे अपंगत्व असलेल्या व्यक्तीस सदनिकेचे वितरण करताना त्याचे वैयक्तिक उत्पन्न किंवा पालकाचे उत्पन्न विचारात घेण्यात येईल. अर्जदाराचे संगणकीय प्रणालीअंतर्गत UDID Card (Unique Disability Indentity) ग्राह्य ठरली जाईल / Capture केली जाईल, याव्यतिरिक्त अन्य कोणताही पुरावा संगणकीय प्रणालीद्वारे ग्राह्य ठरली जाणार नाही / Capture केली जाणार नाही, याची कृपया संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज भरताना विशेष नोंद घ्यावी.

**४.६** द नॅशनल ट्रस्ट फॉर द वेल्फेअर फॉर पर्सन्स विथ ऑटिस्म, सिरेब्रल पालसी, मेन्टल रिटार्डेशन ॲन्ड डिसॅबिलिटिज, ॲक्ट १९९९ मधील प्रकरण ६ मधील कलम १३ ते १७ मधील तरतूदींच्या अधीन राहून गतीमंद (Mental Retarded) व मनोविकृत (Mental Illness) अर्जदारांच्या वतीने संबंधीत व्यक्ती/संस्था अर्ज करु शकतील व या स्वरुपाचे अपंगत्व असलेल्या व्यक्तीस सदनिकेचे वितरण करताना त्याचे वैयक्तिक उत्पन्न किंवा पालकाचे उत्पन्न विचारात घेण्यात येईल. अर्जदाराचे संगणकीय प्रणालीअंतर्गत UDID Card (Unique Disability Indentity) ग्राह्य ठरली जाईल / Capture केली जाईल, याव्यतिरिक्त अन्य कोणताही पुरावा संगणकीय प्रणालीद्वारे ग्राह्य ठरली जाणार नाही / Capture केली जाणार नाही, याची कृपया संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज भरताना विशेष नोंद घ्यावी.

**४.७ वितरणासाठी सदनिकांची उपलब्धता व अर्ज सादर करण्याची पद्धत**

प्रत्येक उत्पन्न गटामध्ये उपलब्ध असलेल्या सदनिकांचा तपशिल या पुस्तिकेच्या **विविध वसाहतीतील विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या सदनिकांचा तपशिल - २** मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) नियम १९८१ मधील नियम १३ च्या तरतूदीनुसार जाहीर करण्यात येणाऱ्या प्रत्येक योजनेतील सदनिकांचे आरक्षण ठेवण्यात येते. त्यानुसार जाहीर करण्यात आलेल्या या योजनांकरिता वेगवेगळ्या प्रवर्गासाठी विहित **टक्केवारी** नुसार आरक्षित सदनिकांचे तपशिल पुस्तिकेमधील **परिशिष्ट ३ (३.१ ते ३.४)** मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे.

**४.८** सदर प्रकल्पाची विकासकामार्फत महारेरा कायद्याअंतर्गत झालेल्या नोंदणीनुसार लाभार्थ्यांनी टप्पेनिहाय रक्कमेचा भरणा करणे बंधनकारक राहील. महानगर पालिकेचे सर्व कर, पाणीपट्टी, मलः निस्सारण आकार, वीज आकार इत्यादी लाभार्थ्यांना / सहकारी गृहनिर्माण संस्थेस / त्या त्या स्थानिक संस्थाकडे परस्पर भरावे लागतील. अधिक तपशिलाकरिता माहिती पुस्तिका पहावी. ज्या प्रकल्पांना भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही, त्या प्रकल्पातील सदनिकांची अंतिम विक्री किंमत प्रकल्पास भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्याच्या वर्षाच्या असर दराच्या (ASR) दरानुसार परिगणित करुन अंतिम करण्यात येतील.

**४.९ समर्पित झालेल्या सदनिकांच्या प्रकरणी करावयाची कार्यवाही :**

अर्जदाराने देकारपत्र निर्गमित करण्यापुर्वी स्वेच्छेने सदनिका समर्पित केल्यास अनामत रक्कमेतून रु.१०००/-प्रशासकीय शुल्क वजा करुन उर्वरित रक्कम अर्जदाराच्या बँक खात्यात विना व्याज परतावा केली जाईल. देकारपत्र दिल्यानंतर कोणत्याही कारणास्तव सदनिकेचे वितरण रद्द करण्यात आल्यास अर्जदाराने सदनिकेच्या किंमतीपोटी भरलेल्या रक्कमेतून, संबंधित सदनिकेच्या विक्री किंमतीच्या १% एवढी रक्कम समपहरण करुन उर्वरित रक्कम विनाव्याज परत करण्यात येईल.

सद्यस्थितीत देकारपत्र दिल्यानंतर कोणत्याही कारणास्तव अर्जदाराने स्वेच्छेने सदनिका सर्पित केल्यास अर्जदाराने सदनिकेच्या किंमतीपोटी भरलेल्या रक्कमेतून, संबंधित सदनिकेच्या विक्री किंमतीच्या १% एवढी रक्कम समपहरण करुन उर्वरित रक्कम विनाव्याज परत करण्यात येईल. मात्र देकारपत्र दिल्यानंतर कोणत्याही कारणास्तव अर्जदाराने सदनिका नाकारल्यास १० % रक्कम कपात करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सदर प्रकरणी प्राधिकरणाचा जो काही ठराव होईल तो सोडत-२०२५ मधील अर्जदारांना लागू राहील. * चिन्हांकित विक्रीस उपलब्ध असलेल्या सदनिका जैसे आहे तशा स्थितीत विक्रीस उपलब्ध करण्यात आले आहेत, त्यामध्ये कोणत्याही / कुठल्याही प्रकारची दुरूस्ती केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

## ५. सदनिकांसाठी संगणकीकृत अर्ज भरण्याची कार्यपद्धती

**५.१** म्हाडा संकेत स्थळ **https://housing.mhada.gov.in** सर्व योजनांकरीता आहे. या व्यतिरिक्त MHADA IHLMS 2.0 या ॲप द्वारे नोंदणी व **https://mhada.gov.in** या संकेतस्थळावर सुद्धा अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध आहे. अर्जदाराने सर्व प्रथम स्वत:ची नाव नोंदणी करावी व सर्व माहिती काळजीपूर्वक भरावी. ऑनलाईन नोंदणी, अर्ज, अनामत भरणा हा विहीत वेळेत व कालावधीत वेळापत्रकामध्ये नमुद तपशीलानुसार काळजीपूर्वक माहीती भरावी.

**५.२** नाव नोंदणीसाठी अर्जदाराने, अर्जामध्ये विहीत केलेली माहिती भरणे आवश्यक आहे. तसेच * अशी खुण असलेली माहिती भरणे बंधनकारक आहे. अशी बंधनकारक माहिती व ड्रॉप डाऊन मधील माहिती फक्त इंग्रजीमध्ये उपलब्ध राहिल.

**५.३ अर्जदाराने ऑनलाईन अर्ज करणेपूर्वी खालील माहिती सोबत ठेवावी, म्हणजे अर्ज भरणे सुलभ जाईल.**

१. ओळखपत्राकरिता - स्वत:चे आधारकार्ड आणि विवाहित असल्यास पती व पती या दोघांचे आधारकार्ड देणे बंधाकारक आहे.

२. स्वाक्षरीचा नमुना व जन्मतारखेकरिता - स्वत:चे पॅन कार्ड आणि विवाहित असल्यास पती व पत्नी या दोघांचे पॅनकार्ड देणे बंधनकारक आहे.

३. अर्जदार सध्या वास्तव्यास असलेल्या घराचा संपूर्ण पत्ता व पोस्टाचा पिन कोड क्रमांक. सुस्पष्टपणे नोंदणी करुन खात्री करणे आवश्यक आहे, जेणेकरुन मंडळाद्वारे होणारा पत्रव्यवहार हा अर्जदारास योग्य पत्यावर प्राप्त होईल.

४. अर्जदाराचा स्वत:चा भ्रमणध्वनी क्रमांक (Mobile No.) व ई-मेल आय डी तसेच मोबाईल नंबर आधारकार्डशी लिंक असणे बंधनकारक आहे.

५. अर्जदाराचे महाराष्ट्रातील वास्तव्याचे अधिवास प्रमाणपत्र (Certificate of Age, Nationality and Domicile).

६. उत्पन्नाच्या स्तोत्राकरिता पात्र उत्पन्न गटानुसार अर्जदाराचे दिनांक ०१/०४/२०२३ ते ३१/०३/२०२४ (Assesment Year - २०२४-२५) मधील आयकर विवरण पत्र अथवा दिनांक ०१/०४/२०२३ ते ३१/०३/२०२४ तहसिलदाराचा उत्पन्नाच्या दाखल्यामधील कौटुंबिक उत्पन्न याबाबत तहसिलदार यांचा उत्पन्नाचा दाखला संगणकीय प्रणालीव्दारे ग्राह्य / Capture केले जाईल. (मुद्दा क्र. ४.५ मध्ये उत्पन्न मर्यादेबाबत अधिक तपशिल स्पष्ट केले आहे.)

७. आरक्षण प्रवर्गाकरिता (जात पडताळणी प्रमाणपत्र)

शासन परिपत्रक क्र. लोआप्र. ११०९/प्र.क्र.३४९/गृनिभू-१, मंत्रालय,मुंबई दि.०७/०५/२०१० अन्वये म्हाडा अंतर्गत अनुसूचित जाती नवबौध्दांसह, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, विमुक्त जमाती या प्रवर्गातील अर्जदारांना वितरीत करण्यात येणारे गाळे/सदनिकांचा ताबा देण्यापुर्वी संबंधित लाभार्थ्याने जात पडताळणी समितीकडून प्राप्त झालेले जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate ) सादर करणे बंधनकारक असेल (ज्या अर्जदारांकडे समितीद्वारे निर्गमित प्रमाणपत्र उपलब्ध असेल अशा प्रमाणपत्रांची पडताळणी Online संगणकीय प्रणालीद्वारे केली जाईल.) व अर्जदाराने सादर केलेले प्रमाणपत्र संबंधित समीतीकडे प्रमाणपत्राची वैधता तपासण्यासाठी पाठविण्यात येईल. संबंधित समितीचा अहवाल प्राप्त झाल्या पश्चात अर्जदाराला सदनिकेचा ताबा देण्याची कार्यवाही करण्यात येईल. तसेच एस सी (SC), एस टी (ST), एन टी (NT) व डीटी (DT) या प्रवर्गातील सोडतीमध्ये यशस्वी होणाऱ्या अर्जदारांनी विहीत नमुन्यातील जात वैधता प्रमाणपत्र अपलोड करण्याकरीता सोडतीनंतर सहा महिन्यात सादर करणे बंधनकारक आहे याची विशेष नोंद घ्यावी.

८. अर्जदाराच्या बँक खात्याचा तपशिलामध्ये बँकेचे नाव, बँकेची शाखा, खाते क्रमांक, आयएफएससी कोड, एमआयसीआर क्रमांक योग्य असल्याची व सदर बँक खाते बंद नसल्याची खात्री करणे आवश्यक आहे. जेणेकरुन अनामत रक्कम भरणा व परतावा करणे सोयीचे होईल. चुकीचे बँक तपशिल दिल्यावर अनामत रक्कम परतावा मध्ये अडचणी उद्‌भवल्यास म्हाडा जबाबदार राहणार नाही (चुकीचे बँकेचे तपशील दिल्यावर अयशस्वी अर्जदाराचे अनामत रक्कम परतावा मध्ये विलंब होऊ शकतो).

अर्जदाराच्या स्वतःच्या बचत खात्याचा तपशील जसे, बँकेचे नाव, शाखा व पत्ता, खाते क्रमांक, बँकेचा MICR/IFSC क्रमांक द्यावा. **अर्जदारास दुसऱ्या व्यक्तीच्या बँक खात्याचा तपशिल देऊन अर्ज करता येणार नाही. तसेच चालु खाते, संयुक्त खाते, एन.आर.आय. खात्याचा तपशील चालणार नाही असे केल्यास संगणकीय प्रणालीद्वारे अर्ज गाह्य ठरला जाणार नाही/Capture केला जाणार नाही याची अर्जदाराने विशेष दक्षता व नोंद घ्यावी.** अर्जदारांच्या बँकेच्या शाखेचा MICR/IFSC क्रमांक टाईप केल्यानंतर सदर बँक व शाखेचे नाव आपोआप प्रदर्शित होत नसेल तर अर्जदाराने अन्य बँक खात्याची माहिती द्यावी अथवा स्वतःच्या बँकेशी संपर्क साधावा.

९. अर्जदाराने अर्जामध्ये त्याचा स्वतःचा **PAN No.** व विवाहित असल्यास आपल्या जोडीदाराचासुद्धा **PAN No.** देणे बंधनकारक आहे. सदर क्रमांक चुकीचा आढळल्यास अथवा दुसऱ्याचा पॅन कार्ड नंबर दिल्यास संगणकीय प्रणालीद्वारे ग्राह्य ठरली जाणार नाही / Capture केली जाणार नाही.

१०. ऑनलाईन रजिस्ट्रेशन करतेवेळी अर्जदाराचा आधारकार्डवरील फोटो ग्राह्य/Capture केला जाईल.

**५.४** ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर अर्जदाराला त्या अंकाऊट द्वारे वेगवेगळ्या संकेत क्रमांकात अथवा एकाच संकेतातील वेगवेगळ्या प्रवर्गात एका पेक्षा जास्त अर्ज भरता येतील. अर्जदारास ऑनलाईन नोंदणी, अर्ज, अनामत भरणा प्रक्रिये करीता उपलब्ध वेळापत्रक पहावे.

**५.५** अर्जदाराने एकदा नोंदणी केल्यानंतर **User Name** व पासवर्डचा वापर करुन सदर अकाऊट **Operate** करता येईल. सर्व **Communication** हे **e-Mail** व **SMS** द्वारे करण्यात येणार असल्यामुळे **e-Mail** व **Mobile No.** भरताना काळजी घेणे तसेच सदर **e-Mail** व **SMS** ताबा प्रक्रियेपर्यंत तोच ठेवणे आवश्यक आहे.

**५.६** **ऑनलाईन अर्ज करणेः ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा शेवटचा/अंतिम दि. १३/०८/२०२५ रात्री ११.५९ वाजेपर्यंत राहील. या कालावधी व्यतिरिक्त कालावधीत कोणी अर्ज भरला असेल तर असा अर्ज सोडत प्रक्रियेमध्ये ग्राह्य धरला जाणार नाही, कृपया अधिक तपशीलाकरीता दोन्ही वेळापत्रके पहावी, अर्ज करताना आपण ज्या उत्पन्न गटाकरिता/प्रवर्गाकरिता पात्र असाल त्या उत्पन्न गटाकरिता असलेल्या संकेताकरिता व प्रवर्गाकरिता अर्ज करावा. त्यानंतर अर्जदाराने प्रिंटेड रिसिप्ट मधील माहिती वाचून बरोबर असल्याची खात्री करावी. अर्जदाराने प्रिंटेड रिसिप्ट स्कॅन करुन पाठवण्यापूर्वी, माहिती टाईप करताना चूक झाली असल्याचे अर्जदाराच्या निदर्शनास आल्यास, अर्जदाराने अगोदर भरलेला ऑनलाईन अर्ज Edit करून त्यामध्ये दुरुस्ती करता येते. अर्ज करण्याच्या शेवटच्या दिवशी दि. १३/०८/२०२५ रात्री ११.५९ नंतर अर्जदाराला पूर्ण अर्ज भरण्याची अथवा भरलेल्या अर्जामध्ये दुरुस्ती करण्याची संधी राहणार नाही.**

अर्जदारास त्यांनी भरलेल्या ऑनलाईन अर्जामध्ये अनामत रक्कमेचा भरणा करण्यापूर्वी बदल करता येईल. अनामत रक्कमेचा भरणा केल्यानंतर अर्ज फक्त पाहता येऊ शकेल. **अर्जदाराने त्याचा ऑनलाईन अर्ज ओपन करुन त्यामध्ये कोणताही फेरफार करणे शक्य होणार नाही याची नोंद घ्यावी.**

**अर्जदाराने प्रिंटेड रिसिट मधील माहिती वाचून बरोबर असल्याची खात्री करावी. प्रिंटेड रिसिट वर अर्ज क्रमांकासमोर जो अंक क्रमांक दर्शविला जाईल. हाच क्रमांक सोडतीसाठी विचारात घेतला जाणार आहे.**

५.७ **अनामत रक्कमेच्या अदायगीसाठी Payment विवरणामध्ये योग्य पर्यायाची निवड करुन अनामत रक्कम व अर्ज फी भरण्याबाबतची प्रक्रिया पूर्ण करावी. (Help File करीता म्हाडा संकेतस्थळ पहावे) ऑनलाईन पेमेंट स्विकृती दि. १४/०८/२०२५ रात्री ११.५९ वा. पर्यंत राहील. Credit/Debit Card, Net Banking, NEFT/RTGS द्वारे** अर्जासोबत **दि. १४/०८/२०२५ रात्री ११.५९ वा.** पर्यंत करणे क्रमप्राप्त/बंधनकारक आहे. याबाबत कृपया नोंद घ्यावी.

५.८ जे अर्जदार ऑनलाईन पेमेंट करणार आहेत त्या अर्जदारांनी :-

**(अ)** ऑनलाईन अर्ज यशस्वीरित्या Submit झाल्यानंतर प्रिंटेड रिसीप्ट प्राप्त करावी किंवा जतन करावी. त्याची प्रिंट काढुन स्वाक्षरी करुन स्कॅन करुन Payment Option वर क्लीक करुन तिथे अपलोड करावे.

**(ब) अर्जाची प्रिंट अपलोड केल्यानंतर अर्जदाराने My Application मध्ये जाऊन पेमेंट करावे.**

५.९ अर्जदार Net Banking, Credit Card, Debit Card, RTGS, NEFT द्वारे Online Payment करु शकतात. [अनामत रक्कम + विनापरतावा अर्ज शुल्क ₹ ५९०/- (अर्ज ₹ ५०० + १८% GST ₹ ९०)], RTGS, NEFT द्वारे भरणा करायची असल्यास चलनद्वारे अनामत रक्कम + अर्ज शुल्क भरावी लागेल. RTGS, NEFT चा पर्याय स्विकारल्यावर चलन प्राप्त होईल. चलन वर नमुद खाते क्रमांक मध्ये रक्कम जमा झाल्यास अर्जदारास SMS द्वारे कळविण्यात येईल. ज्या अर्जदाराची यशस्वीरीत्या अनामत रक्कम भरणा होईल व ज्यांचे अर्ज संगणकीय प्रणाली द्वारे पात्र ठरतील. असे लाभार्थी सोडतीमध्ये सहभागाकरीता पात्र ठरतील.

५.१० अर्जदारांनी अनामत रक्कम भरुन सादर केलेला अर्ज सोडतीपूर्वी कोणत्याही कारणास्तव मागे घेता येणार नाही व सोडतीपूर्वी अनामत रक्कम परत मिळणार नाही. अर्जदाराने Credit Card द्वारे अनामत रक्कम भरल्यावर जर त्याने रक्कम म्हाडाकडे पोहोचण्यापूर्वी परत घेतली तर अर्जदाराचा अर्ज सोडतीकरीता ग्राह्य धरला जाणार नाही.

५.११ अर्जदार त्याच्या उत्पन्न गटानूसार पात्र असलेल्या योजना संकेतासाठी अर्ज करु शकेल. तथापी एकापेक्षा जास्त पात्र योजना संकेतासाठी अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक संकेत क्रमांकासाठी स्वतंत्र अनामत रक्कमेसह वेगळा अर्ज भरावा लागेल. जर अर्जदार एकापेक्षा जास्त योजना संकेत क्रमांकामध्ये सोडतीत यशस्वी झाला, तर त्याला कुठल्याही एकाच योजना संकेतासाठी निकाल जाहिर झाल्यानंतर ०७ दिवसाच्या आत कोणत्याही एकाच योजना संकेतासाठी आपली पसंती Online सादर करणे बंधनकारक आहे.

५.१२ अर्जदार योजना संकेतामधील ज्या प्रवर्गामध्ये अर्ज करण्यास पात्र आहे अशा सर्व पात्र आरक्षण प्रवर्गातील सदनिकांकरिता अर्ज करु शकतो. प्रत्येक योजनेतील व पात्र प्रवर्गातील सदनिकेकरिता स्वतंत्र अर्ज करावे लागतील व प्रत्येक अर्जासोबत स्वतंत्र अनामत रक्कम भरावी लागेल. **मात्र एका योजना संकेतामधील एका प्रवर्गात एकापेक्षा अधिक अर्ज करता येणार नाहीत. तसेच एका पेक्षा जास्त उत्पन्न गटामध्ये अर्ज करता येणार नाहीत. एकाच संकेतामध्ये व एकाच प्रवर्गात एकापेक्षा अधिक अर्ज केल्याचे आढळल्यास त्या अर्जदाराचे त्या प्रवर्गातील असे सर्व अर्ज कोणतेही कारण न देता रद्द करण्यात येतील.**

वरील अटी व्यतिरिक्त सदर योजनेतील सदनिकांसाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास (मिळकत व्यवस्थापन, गाळ्यांची विक्री, हस्तांतरण व सदनिकांची अदलाबदल) विनियम - १९८१ च्या अटी व शर्ती जशाच्या तशा व संपूर्णपणे (वेळोवेळी होणाऱ्या सुधारणासह) लागू राहतील.

## ६. सदनिकांच्या संगणकीकृत सोडतीची कार्यप्रणाली

६.१ जाहिरातीनुसार प्राप्त झालेल्या सर्व ऑनलाईन अर्जांची सोडतीकरिता पात्रता निश्चिती ही MHADA IHLMS 2.0 या नवीन संगणकीय कार्यपणाली अंतर्गत करण्यात येईल. अर्ज विहित अनामत रक्कमेसह पूर्णपणे भरले आहेत की नाही हे तपासण्यात येईल. अपूर्ण आढळलेले अर्ज सोडतीपूर्वी रद्द केले जातील व त्याबाबत अर्जदाराकडून केलेल्या कोणत्याही निवेदनाचा विचार केला जाणार नाही. खालील प्रकारचे अर्ज आढळल्यास असे सर्व अर्ज सोडतीमधुन संगणकीय प्रणालीव्दारे आपोआप बाद ठरविले जातील.

१. एकाच अर्जदाराचे एकाच संकेतामध्ये, एकाच प्रवर्गात एकापेक्षा जास्त अर्ज.
२. एकाच अर्जदाराचे वेगवेगळया उत्पन्न गटामध्ये केलेले अर्ज.
३. वेगवेगळया अर्जदाराचे एकाच बँकेमध्ये एकच खाते क्रमांक.
४. चुकीचा **PAN** क्रमांक नमुद केलेले अर्ज.
५. विहित मुदतीमध्ये अनामत रक्कम इंडियन बँकेत जमा न झालेले अर्ज.
६. ऑनलाईन अर्ज चालु होण्यापूर्वी व मुदत संपल्यानंतर केलेले अर्ज. ऑनलाईन अर्ज चालु होण्याची व बंद होण्याची वेळ ही **Server** मध्ये असलेली वेळ ग्राह्य धरण्यात येईल.

६.२ सोडतीसाठी पात्र असलेल्या अर्जदारांचे अर्ज क्रमांकांची आरक्षण निहाय प्रारुप यादी म्हाडाच्या **https://housing.mhada.gov.in** या अधिकृत संकेतस्थळावर **दिनांक २१/०८/२०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजता** प्रसिध्द करण्यात येईल. त्याबाबत अर्जदारांच्या तक्रारी असतील तर अशा अर्जदारांनी संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द झाल्यापासून **दिनांक २१/०८/२०२५ रोजी प्रारुप यादी प्रसिद्ध झाल्यापासून दि. २५/०८/२०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत** या कार्यालयाकडे ऑनलाईन हरकती सादर करणे आवश्यक आहे. याबाबतची माहिती म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तथापी अर्जदाराने अर्जामध्ये लिहिलेल्या माहिती मध्ये बदल केला जाणार नाही. सोडतीनंतर कोणत्याही तक्रारीचा विचार केला जाणार नाही. अशा प्रकारे आलेल्या हरकतींची छाननी करुन सोडतीसाठी पात्र असलेल्या अर्जदारांची अंतिम यादी **दि. ०१/०९/२०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजता** वरील संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**MHADA IHLMS 2.0 या संगणकीय प्रणाली सोडतीसाठी पात्र ठरलेल्या अर्जदारांची संगणकीय सोडत दिनांक ०३/०९/२०२५ रोजी सकाळी १०.०० पासून डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह, ठाणे (पश्चिम) येथे काढण्यात येणार आहे. सोडतीची जाहिरात वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात येईल. तसेच म्हाडाचे अधिकृत संकेत्तस्थळ https://www.mhada.gov.in व https://housing.mhada.gov.in वर प्रसिध्द करण्यात येईल. सोडतीच्या दिनांकाबाबत अर्जदारांना वैयक्तिकरित्या कळविण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**

६.३ संगणकीय सोडत काढताना अर्जदाराच्या अर्जाचा क्रमांक हाच लॉटरी जनरेशन क्रमांक म्हणून गृहित धरण्यात येईल. सोडतीच्या निकालात त्यांनी त्यांच्या अर्जाचा क्रमांक तपासावा. सोडतीत यशस्वी झालेल्या तसेच प्रतिक्षा यादीवरील अर्जदारांचे अर्जाचे क्रमांक म्हाडाच्या **https://www.mhada.gov.in** व **https://housing.mhada.gov.in** या संकेतस्थळावर तसेच म्हाडाच्या नोटीस बोर्ड वर प्रसिध्द करण्यात येतील. संगणकीय सोडतीत यशस्वी झालेल्या अर्जदारांना तात्पुरते देकारपत्र पत्राव्दारे स्वतंत्र्यरित्या कळविण्यात येईल.

६.४ MHADA IHLMS 2.0 या संगणकीय प्रणालीद्वारे पात्र ठरलेल्या अर्जातून स्वतंत्रपणे संकेत क्रमांक निहाय व आरक्षण प्रवर्ग क्रमांक निहाय जाहिर सोडत संगणकाद्वारे काढण्यात येईल. सदर सोडतीकरीता कोंकण मंडळ स्तरावर मा. उपाध्यक्ष, प्राधिकरण यांच्या मान्यतेने १०% प्रतिक्षा यादी एकूण संकेतनिहाय सदनिकांच्या संख्येच्या प्रमाणात ठेवण्यात आली आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

६.५ एखाद्या संकेतांकरिता अथवा त्यामधील प्रवर्गाकरिता प्रत्यक्ष मागणीपेक्षा प्रतिसाद कमी आल्यास, व त्यामुळे सदनिका रिक्त राहिल्यास महाराष्ट्र गृहार्मिाण व क्षेत्रविकास अधिनियम - १९७६ च्या अंतर्गत (जमीनीची विल्हेवाट) विनियम १९८१ मधील विनियम १३ अंतर्गत MHADA IHLMS 2.0 या संगणकीय प्रणालीव्दारे कार्यवाही केली जाईल.

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम - १९७६ च्या अंतर्गत (जमीनीची विल्हेवाट) नियम १९८१ मधील विनियम १३ मधील तरतूद खालीलप्रमाणे आहे.**

(a) If sufficient number of applications are not received from the persons belonging to any of the categories (1)-SC, (1-a)- ST, (1-b)- NT and (1-c) - DT the applications from persons belonging to any of the other said four categories shall be considered for the reservation;

(b) If sufficient number of applications are not received from the persons belonging to category (5)- DF, the applications from persons belonging to category (6) - EX shall be considered for the said reservations;

(c) If sufficient number of applications are not received from the persons belonging to any of the reserved categories, other than those mentioned in clause (a) above, tenements or plots reserved for such categories remaining unallotted may be released for allotment to persons belonging to the General Category. The tenements or plots reserved for categories (1)-SC, (1-a)- ST, (1-b)- NT, and (1-c)- DT shall not however, be released for allotment to persons belonging to the General Category (GP) subject to the provision of clause (a) above to persons belonging to any other reserved category, without the approval of Government.

- म्हाड (भू-विनियोग) नियम १९८१ मधील विनियम १३ (अ) अन्वये अनुसूचित जाती आणि नवबौद्ध (SC), अनुसुचित जमाती (ST), भटक्या जमाती (NT), विमुक्त जाती (DT) या पैकी कोणत्याही प्रवर्गाकरीता उपलब्ध सदनिकांच्या संख्ये एवढे अर्ज प्राप्त न झाल्यास प्रवर्गनिहाय रिक्त राहणाऱ्या सदनिकांसाठी इतर ४ प्रवर्गातील अर्जदारांचे अर्ज या आरक्षणाखाली विचारात घेतले जातील.
- म्हाड (भू-विनियोग) नियम १९८१ मधील विनियम १३ (ब) अन्वये संरक्षण दलातील किंवा सीमा सुरक्षा दलातील जे कर्मचारी लढाईत जखमी होऊन अपंग झालेले आहेत (DF) या प्रवर्गात उपलब्ध सदनिकांपेक्षा कमी अर्ज प्राप्त झाल्यास सदर सदनिकांचे आरक्षण माजी सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती (EX) या प्रवर्गातून भरणेत येईल.
- म्हाड (भू-विनियोग) नियम १९८१ मधील विनियम १३ (क) अन्वये अनुसूचित जाती आणि नवबौद्ध (SC), अनुसुचित जमाती (ST), भटक्या जमाती (NT), विमुक्त जाती (DT) हे प्रवर्ग वगळून उर्वरीत प्रवर्गासाठी उपलब्ध असणाऱ्या सदनिकांच्या संख्ये एवढे अर्ज उपलब्ध न झाल्यास उर्वरीत सदनिका या सर्वसाधारण जनता (GP) या प्रवर्गातील अर्जदारांस वितरीत केल्या जातील.
- मात्र एखाद्या योजनेतील एखाद्या प्रवर्गासाठी उपलब्ध सदनिकांपेक्षा कमी अर्ज प्राप्त झालेले असल्यास वर नमुद विनियम १३ (अ), (ब) व (क) नुसार सोडत काढण्यात येईल. सोडतीमध्ये यशस्वी ठरलेल्या सर्व अर्जदारांचा समावेश यशस्वी लाभार्थी यादीमध्ये करण्यात येईल. विनियम १३ (अ), (ब) व (क) नुसार सोडतीमध्ये यशस्वी होणाऱ्या अर्जदारांनी पात्रतेकरीता कागदपत्र सादर करताना अर्जदारांनी सोडतीमध्ये अर्ज करताना ज्या प्रवर्गात अर्ज केलेला आहे त्याच प्रवर्गातील कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील.

यशस्वी लाभार्थीच्या यादीतील अर्जदारांची पात्रता निश्चित करण्याकरिता अर्जदारांना अर्जात नमूद केलेल्या माहितीच्या पुष्ठ्यार्थ संगणकीय प्रणालीमध्ये सादर केलेली माहिती Capture करून

पात्रता निश्चिती केली जाईल. कागदोपत्री पुरावा सादर करणे आवश्यक राहिल.

**विनियम १३ (अ), (ब) व (क) नुसार संगणकीय सोडतीची कार्यपध्दती :-**

- सोडतीकरीता स्विकृत अर्जांची अंतिम यादी प्रसिध्द झाल्यानंतर उच्चस्तरीय समिती समोर (OSC) प्रवर्गनिहाय सोडतीकरीता उपलब्ध अर्जांचा तपशिल सादर करण्यात येईल. प्रथमतः अनुसूचित जाती आणि नवबौद्ध (SC), अनुसुचित जमाती (ST), भटक्या जमाती (NT), विमुक्त जाती (DT) या प्रवर्गाकरीता उपलब्ध सदनिकांपेक्षा कमी अर्ज प्राप्त झाल्यास म्हणजेच या प्रवर्गात सोडतीकरीता मागणी अभावी सदनिका रिक्त असतील त्या प्रवर्गातील सदनिका म्हाड अधिनियम १३ (अ) नुसार इतर तीन प्रवर्गात (ज्या प्रवर्गात घरांच्या संखेपेक्षा अर्जांची संख्या जास्त असेल) समसमान विभागल्या (Shifted) जातील.
- सोडतीच्या वेळी त्या त्या प्रवर्गातील सोडतीकरीता उपलब्ध सदनिका अधिक म्हाड अधिनियम १३ (अ) नुसार Shift केलेल्या सदनिका यांची प्रवर्गनिहाय एकत्रित सोडत काढण्यात येईल व त्याची यादी प्रसिध्द करण्यात येईल. म्हाड अधिनियम १३ (अ) नुसार Shifted झाले असल्यास यशस्वी अर्जदारांच्या निकालामध्ये ज्या प्रवर्गातुन जेवढया सदनिका Shift करण्यात आलेल्या आहेत त्याचा उल्लेख केला जाईल.
- सोडतीकरीता स्विकृत अर्जांची अंतिम यादी प्रसिध्द झाल्यानंतर उच्चस्तरीय समिती समोर (OSC) प्रवर्गनिहाय सोडतीकरीता उपलब्ध अर्जांचा तपशिल सादर करण्यात येईल. संरक्षण दलातील किंवा सीमा सुरक्षा दलातील जे कर्मचारी लढाईत जखमी होऊन अपंग झालेले आहेत (DF) या प्रवर्गात उपलब्ध सदनिकांपेक्षा कमी अर्ज प्राप्त झाल्यास सदर सदनिकांचे आरक्षण माजी सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती (EX) या प्रवर्गातून भरणेत येईल. म्हणजेच (DF) या प्रवर्गात सोडतीकरीता मागणी अभावी सदनिका रिक्त असतील तर त्या सदनिका म्हाड अधिनियम १३ (ब) नुसार (EX) या प्रवर्गात Shift केल्या जातील. तथापि (DF) संवर्गातील रिक्त सदनिका (EX) संवर्गात Shift केल्यानंतर देखिल (DF) संवर्गातील सदनिका रिक्त राहत असल्यास विनियम १३(क) नुसार सदर सदनिका (GP) प्रवर्गातुन भरण्यासाठी Shift केल्या जातील. सदर कार्यवाही सोडतीकरीता स्विकृत अर्जांची अंतिम यादी प्रसिध्द झाल्यानंतर उच्चस्तरिय समितीसमोर करण्यात येणार आहे.
- सोडतीच्या वेळी (EX) प्रवर्गातील सोडतीकरीता उपलब्ध सदनिका अधिक (+) म्हाड अधिनिय १३ (ब) नुसार Shift केलेल्या सदनिका यांची एकत्रित सोडत काढण्यात येईल व त्याची यादी प्रसिध्द करण्यात येईल. म्हाड अधिनियम १३ (ब) नुसार Shifted झाले असल्यास यशस्वी अर्जदारांच्या निकालामध्ये या प्रवर्गातुन तेवढया सदनिका Shift करण्यात आलेल्या आहेत त्याचा उल्लेख केला जाईल.
- सोडतीकरीता स्विकृत अर्जांची अंतिम यादी प्रसिध्द झाल्यानंतर उच्चस्तरीय समिती समोर (OSC) प्रवर्गनिहाय सोडतीकरीता उपलब्ध अर्जांचा तपशिल सादर करण्यात येईल. अनुसूचित जाती आणि नवबौदध (SC), अनुसुचित जमाती (ST), भटक्या जमाती (NT), विमुक्त जाती (DT) हे प्रवर्ग वगळून उर्वरीत प्रवर्गासाठी उपलब्ध असणाऱ्या सदनिकांच्या संख्ये एवढे अर्ज उपलब्ध न झाल्यास (विनियम १३(ब) प्रमाणे Shifting नंतर) अशा प्रवर्गातील रिक्त राहणाऱ्या सदनिका या सर्वसाधारण जनता (GP) या प्रवर्गातील अर्जदारांना वितरीत करण्यासाठी Shift करण्यात येतील. सदरची कार्यवाही उच्चस्तरीय समिती समोर स्विकृत अर्जांची अंतिम यादी प्रसिध्द झाल्यानंतर करण्यात येईल.
- सोडतीच्या वेळी SC, ST, NT, DT या प्रवर्गाव्यतिरिक्त उर्वरित प्रवर्गनिहाय उपलब्ध सदनिकांची सोडत व GP प्रवर्गातील उपलब्ध सदनिकांची सोडत अधिक (+) म्हाड अधिनियम १३ (क) नुसार शिल्लक सदनिका यांची एकत्रित सोडत काढण्यात येईल व त्याची यादी प्रसिध्द करण्यात येईल. म्हाड अधिनियम १३ (क) नुसार Shifted झाले असल्यास यशस्वी अर्जदारांच्या निकालामध्ये ज्या प्रवर्गातुन जेवढया सदनिका Shift करण्यात आलेल्या आहेत त्याचा उल्लेख केला जाईल. विनियम १३ (अ), (ब) व (क) नुसार सोडतीमध्ये यशस्वी होणाऱ्या अर्जदारांनी पात्रतेकरीता कागदपत्र सादर करताना अर्जदारांनी सोडतीमध्ये अर्ज करताना ज्या प्रवर्गात अर्ज केलेला आहे त्याच प्रवर्गातील कागदपत्रे संगणकीय प्रणालीद्वारे पात्रता निश्चित केली जाईल.

६.६ अर्जदाराने सोडतीमध्ये यशस्वी ठरल्यानंतर त्याचे स्विकृती हि सिसटिम जनरेटेड असल्यामळे विहित मुदतीत स्विकृती कळविली नाही तर संगणकीय प्रणालीद्वारे संबंधित अर्जदाराचा अर्ज आपोआप / by default रद्द होईल व त्याची अनामत रक्कम त्यांनी दिलेल्या बँक खाती / द्वारे अनामत परतावा संगणकीय प्रणालीव्दारे आपोआप RTGS / NEFT कार्यावित होईल याची कृपया नोंद घ्यावी. त्यामुळे यशस्वी अर्जदाराने स्विकृती पत्र विहित मुदतीत करण्याची दक्षता घ्यावी.

६.७ सोडतीमध्ये अयशस्वी झालेल्या अर्जदारांना त्यांनी अदा केलेली संपूर्ण अनामत रक्कम (विनाव्याज) अर्ज शुल्क वगळून (ऑनलाईन अर्जापोटी अदा केलेले ₹ ५००/- + जीएसटी @ १८% ₹ ९०/-) Electronic Clearing System (ECS) / NEFT द्वारे अर्जदाराच्या बँक खात्यात अदा करण्यात येणार असल्यामुळे अर्जदाराने त्यांच्या अर्जात त्याच्या बँकेचे नाव, शाखेचे नाव व पत्ता, बँक खाते क्रमांक व एम.आय.सी.आर. (MICR) क्रमांक (९ अंकी) अथवा आय.एफ.एस.सी. (IFSC) क्रमांक अचूकपणे नमूद करावा. या अर्जदारांनी Debit/Credit Card द्वारे अनामत रक्कम जमा केली आहे, अशा अयशस्वी अर्जदारांची अनामत रक्कम सुध्दा त्यांनी त्यांच्या अर्जात नमूद केलेल्या बँक खात्यावरच परत करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

६.८ अर्जदाराला सोडतीमध्ये अर्ज केलेल्यापासून सोडतीपर्यंतची माहिती त्यांनी दिलेल्या मोबाईल क्रमांकावर, एसएमएस व ई-मेल द्वारा पाठविण्यात येईल. त्यामुळे अर्जदाराने अचूक मोबाईल क्रमांक व ई-मेल आय.डी. द्यावा. अर्जदाराने अर्ज भरताना दिलेला मोबाईल क्रमांक व ई-मेल बदलू नये.

६.९ सदरच्या कालावधीत मोबाईल मध्ये **Do Not Disturb (DND)** हि सेवा कार्यरत नसल्याची अर्जदाराने दक्षता घ्यावी.

## ७. सदनिकांची विक्री किंमत भरणा करावयाच्या अटी व शर्ती

**अ.** योजनेतील प्रत्येक सदनिकेसाठी दर्शविण्यात आलेली विक्री किंमत तात्पुरती असून कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ आणि महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांना सदनिकेच्या विक्रीची किंमत व दर अंतिम करण्याचा वा त्यामध्ये वाढ करण्याचा तसेच सदनिकांच्या संख्येत वाढ वा घट करण्याचा अंतिम अधिकार राहील.

**ब.** सदनिकांकरीता विक्री किंमत भरण्याची पद्धत :-

**ब.१** सदनिकांचे देकारपत्र स्थानिक स्वराज्य संस्थेकडुन भोगवटा प्रमाणपत्र (OC-Occupation Certificate) प्राप्त झाल्यानंतरच पाठविण्यात येईल. भोगवटा प्रमाणपत्र मिळेपर्यंत अर्जदाराची फक्त अनामत रक्कम जमा राहील. तसेच भोगवटा प्रमाणपत्र मिळण्यास उशीर झाल्यास त्याला म्हाडा जबाबदार राहणार नाही. १५% एकात्मिक व २0% सर्वसमावेशक योजनेमध्ये यशस्वी ठरलेल्या लाभार्थ्यांकडून १% प्रशासकीय शुल्क घेण्यात येऊन अंदाजीत विक्री किंमत व इतर देय रक्कम विकासकास प्राधिकरणाच्या दिनांक 0१ एप्रिल २0१७ परिपत्रकानुसार भरणा करावे लागेल व त्या अनुषंगाने ताबा देण्याची कार्यवाही विकासकाने करणे क्रमप्राप्त आहे. जर नियोजित वेळेत ताबा देण्यास उशीर होत असल्यास विकासकाने विक्री किंमत घेण्याबाबतचे वेळापत्रक कळविणे आवश्यक आहे.

**ब.२** यशस्वी अर्जदाराने त्याची गाळ्याकरिता ऑनलाईन स्विकृती विहित मुदतीत कळविल्यानंतर त्यास देकार पत्राची ऑनलाईन लिंक प्राप्त होईल सदर लिंक डाउनलोड करून त्यामध्ये नमूद टप्यानूसार रक्कम भरणा करणे क्रमप्राप्त आहे.

| टप्पा | विक्री किंमत बाबत माहिती | विक्री किंमत भरावयाची कार्यपद्धती व मुदत |
|---|---|---|
| १ | १५% एकात्मिक योजना (ITP) व २0% सर्वसमावेशक योजनेसाठी सदनिकेच्या एकूण विक्री किंमतीच्या १% प्रशासकीय रक्कम | देकार पत्राच्या दिनांकापासून ३0 दिवसात १% प्रशासकीय रक्कम भरावयाची आहे विहित मुदतीत सदरहु रक्कम भरणा न केल्यास अतिरिक्त १५ दिवसांची अतिरिक्त मुदतवाढ ही ११% व्याजासह प्रशासकिय आकार भरणा करण्याच्या अटी शर्तीवर देण्याची तजविज करण्यात आली आहे. तद्नंतर कुठल्याही प्रकारची मुदतवाढ देण्यात येणार नाही आपला यशस्वी ठरेलेला अर्ज हा संगणकीय प्रणालीद्वारे रद्द केला जाईल याची विशेष नोंद घ्यावी. |
| २ | १५% एकात्मिक योजना (ITP) व २0% सर्वसमावेशक योजनेसाठी १% प्रशासकीय रक्कम वजावट करून उर्वरित अंदाजित विक्री किंमत रक्कम विकासकास भरणा करावयाची आहे | यशस्वी लाभार्थ्यास सदनिकेची अंदाजित विक्री किंमत UDCPR-PARA ३.८.२ व 14.1.1.9 मधील तरतूदीनुसार भरणा करावी लागेल. गृह कर्ज उभारणीसाठी ‘‘**ना हरकत प्रमाणपत्र**’’, ताबा इ. आनुषंगिक बाबी विकासकाकडे यशस्वी लाभार्थ्याने करणे क्रमप्राप्त आहे. जाहिरातीत नमूद केलेली किंमत सदनिकेची मूळ विक्री किंमत असून लाभार्थ्यांना जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या सदनिकांच्या रक्कमेव्यतिरीक्त **जीएसटी, स्टॅम्प ड्युटी, रजिस्ट्रेशन चार्जेस, प्रॉपर्टी टॅक्स, शासकीय / महानगरपालिकेकडील शुल्काचा भरणा तसेच शासकीय देय शुल्काचा भरणा करावा लागेल.** या योजनेअंतर्गत यशस्वी लाभार्थ्याने म्हाडाकडे विक्री किंमतीच्या १% प्रशासकीय शुल्काचा भरणा करणे क्रमप्राप्त आहे. तद्नंतर तात्पुरते देकारपत्र देण्याची कार्यवाही केली जाईल. सदर प्रकल्पामध्ये सामाईक पार्किंग उपलब्ध असून या व्यतिरिक्त |

| टप्पा | विक्री किंमत बाबत माहिती | विक्री किंमत भरावयाची कार्यपद्धती व मुदत |
|---|---|---|
| | | स्वमालकीचे कव्हर्ड पार्किंग (उपलब्धतेनुसार) हवे असल्यास विकासकाकडे संपर्क साधावा लागेल, याची कृपया नोंद घ्यावी. ज्या प्रकल्पांना भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही, त्या प्रकल्पातील सदनिकांची अंतिम विक्री किंमत प्रकल्पास भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्याच्या वर्षाच्या असर दराच्या (ASR) दरानुसार परिगणित करुन मंडळाद्वारे अंतिम करण्यात येतील. |

सदनिके पोटी भरावयाची प्रशासकिय शुल्क अथवा विक्री किंमत भरणा करण्यास यशस्वी अर्जदाराने कसूर केल्यास किंबहूना न भरल्यास त्यास देण्यात आलेले देकार पत्र रद्द करण्यात येऊन संबंधित अर्जदाराने भरणा केलेल्या रक्कमेतून सदनिकेच्या किंमतीच्या १% एवढी रक्कम समपहरण (Forfeit) केली जाईल. उर्वरित रक्कम कोणतेही व्याज न देता अर्जदाराने संगणकिय सोडतीमध्ये नोंदविलेल्या बॅंक खात्यामध्ये जमा करण्यात येईल व त्याचा सदनिकेवरिल हक्क कायमस्वरूपी संपुष्टात येईल याची नोंद घ्यावी.

**ब.२.२** ज्या अर्जदारांना १००% रक्कम एकाच टप्प्यामध्ये (एक रकमी) भरावयाची आहे, असे अर्जदार बॅंकेमध्ये एक रक्कमी म्हणजेच १००% रक्कम भरु शकतात व भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त असल्यास त्यांना विहित वितरण प्रणाली अंतर्गत ताबा सुध्दा देण्याची कार्यवाही केली जाईल. सदर बाब ही कोंकण मंडळ अंतर्गत विक्री करण्यात येणाऱ्या गाळे व भूखंडांकरीता सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

**ब.३** विक्री किंमतीचा पहीला हप्ता भरणा केल्यानंतर लाभार्थी अर्जदाराने मागणी केल्यास कोणत्याही वित्तिय संस्थेकडून कर्ज प्राप्त होण्यासाठी मंडळाचे **''ना हरकत प्रमाण पत्र''** देण्यात येईल. त्याकरिता अर्जदाराने ना हरकत प्रमाणपत्र मिळणेसाठी पोस्ट लॉटरी सॉफ्टवेअर द्वारे Bank Sanction Letter अर्जाव्दारे अपलोड करणे आवश्यक आहे. १५% एकात्मिक/२०% सर्व समावेशक योजनेअंतर्गत यशस्वी लाभार्थ्यांकडून म्हाडाला १% प्रशासकीय आकार घेण्याची कार्यवाही केली जाते व विकासकाकडे विक्री किंमत भरणा केली जाते. त्यामुळे, १५% एकात्मिक योजना (ITP) व २०% सर्वसमावेशक योजनेमधील अर्जदारांना ''ना- हरकत प्रमाणपत्र'' हे विकासकाद्वारे देण्यात येईल, म्हाडाद्वारे देण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**ब.४** सोडतीनंतर यशस्वी अर्जदारांनी अर्ज मागे घेतल्यास देकारपत्र निर्गमित करण्यापूर्वी अर्जासोबत भरलेली अनामत रक्कम विनाव्याज ₹ १०००/- इतकी रक्कम प्रशासकिय खर्च म्हणून वजावट करुन परत करण्यात येईल. १५% एकात्मिक/२०% सर्वसमावेशक योजना, कोंकण मंडळ योजना व भूखंड या पैकी कोणत्याही योजनांमधील संकेतांमध्ये एका पेक्षा अधिक जागी लाभार्थी यशस्वी ठरल्यास अर्जासोबत भरलेली अनामत रक्कम विनाव्याज परत केली जाईल तसेच ₹ १०००/- इतकी रक्कम प्रशासकिय खर्च म्हणून समपहरण (Forfeit) करुन उर्वरीत अनामत रक्कम परत करण्यात येईल.

**ब.५** अर्जदार सोडतीमध्ये यशस्वी ठरल्यानंतर आवश्यक कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळल्यास अनामत रक्कम प्रशासकिय खर्च म्हणून वजावट केली जाईल. तसेच विक्री किंमत भरणा केली असल्यास विक्री किंमतीच्या १% रक्कम वजावट केली जाईल. सादर केलेले कागदपत्रे बनावट आढळल्यास कायदेशीर कार्यवाही करुन

सदनिका रद्द केली जाईल/ताब्यात घेण्यात येईल व भरणा केलेली विक्री किंमत समपहरण (Forfeit) केली जाईल, याची नोंद घ्यावी.

**ब.६** अर्जदार किंवा त्याचे पती / पत्नीने एकापेक्षा जास्त विविध प्रवर्गात / विविध संकेतांकात अर्ज केल्यास व त्याचे विविध प्रवर्गात / विविध संकेतांमध्ये एकापेक्षा जास्त अर्ज सोडतीमध्ये यशस्वी ठरल्यास त्यांना दोघांना मिळून एकाच प्रवर्गात / एकाच संकेतांकात एकच सदनिका वितरीत करण्यात येईल व अशा परिस्थितीत या दुसऱ्या प्रवर्गामध्ये / संकेतांकामध्ये त्यांनी अर्ज केलेला असेल तेथून त्यांना माघार घ्यावी लागेल. अशा प्रकारे माघार घेतलेल्या सर्व अर्जासाठी त्यांनी भरलेली अनामत रक्कम विनाव्याज ₹ १,०००/- इतकी रक्कम प्रशासकिय खर्च म्हणून समपहरण (Forfeit) करुन उर्वरीत अनामत रक्कम परत करण्यात येईल.

**ब.७** **समर्पित झालेल्या सदनिकांच्या प्रकरणी करावयाची कार्यवाही :**

अर्जदाराने देकारपत्र (Provisional Offer Letter) निर्गमित करण्यापुर्वी स्वेच्छेने सदनिका समर्पित केल्यास अनामत रक्कमेतून रु.१०००/-प्रशासकीय शुल्क वजा करुन उर्वरित रक्कम अर्जदाराच्या बँक खात्यात विना व्याज परतावा केली जाईल. देकारपत्र दिल्यानंतर कोणत्याही कारणास्तव सदनिकेचे वितरण रद्द करण्यात आल्यास अर्जदाराने सदनिकेच्या किंमतीपोटी भरलेल्या रक्कमेतून, संबंधित सदनिकेच्या विक्री किंमतीच्या १% एवढी रक्कम समपहरण करुन उर्वरित रक्कम विनाव्याज परत करण्यात येईल.

सद्यस्थितीत देकारपत्र दिल्यानंतर कोणत्याही कारणास्तव अर्जदाराने स्वेच्छेने सदनिका सर्पित केल्यास अर्जदाराने सदनिकेच्या किंमतीपोटी भरलेल्या रक्कमेतून, संबंधित सदनिकेच्या विक्री किंमतीच्या १% एवढी रक्कम समपहरण करुन उर्वरित रक्कम विनाव्याज परत करण्यात येईल. मात्र देकारपत्र दिल्यानंतर कोणत्याही कारणास्तव अर्जदाराने सदनिका नाकारल्यास १०% रक्कम कपात करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सदर प्रकरणी प्राधिकरणाचा जो काही ठराव होईल तो सोडत-२०२५ मधील अर्जदारांना लागू राहील.

# ८. विशेष अटी व शर्ती

अ. सदनिकेचा ताबा संबधित योजनेस महापालिकेचे भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्यानंतर देण्यात येईल. भोगवटा प्रमाणपत्र मिळण्यास जास्त वेळ लागल्यास भरलेल्या रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज देय राहणार नाही. तसेच सदनिकांसाठी पाणी पुरवठा म.न.पा. कडून केला जातो. सदनिकांचा ताबा देण्यापूर्वी पाणी पुरवठा मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. तथापि त्यास विलंब झाल्यास म्हाडा जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**ब. यशस्वी व पात्र ठरलेला अर्जदार विवाहित असल्यास सदनिकेचे वितरणपत्र व ताबापत्र अर्जदार व त्याची पती/पत्नी या दोघांच्या नावे करण्याची कार्यवाही ही महाराष्ट्र शासन पत्र क्र. न्यायाप्र-२०१५/प्र.क्र.१६८/गृनिभू/ गृनिवि, दि.२४/०९/२०१५ अन्वये संयुक्त नावे वितरण व ताबा देण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

ड. महानगर पालिकेचे सर्व कर, पाणीपट्टी, मल:निस्सारण आकार, वीज आकार इत्यादी लाभार्थीस/सहकारी गृहनिर्माण संस्थेस त्या त्या स्थानिक संस्थाकडे परस्पर भरावे लागतील.

इ. लाभार्थी सदनिका धारकांना त्यांची सहकारी गृहनिर्माण संस्था निर्माण करुन ती पंजीकृत करुन घ्यावी लागेल. मंडळाची सर्व देय रक्कम अदा केल्यानंतर इमारती खालील व इमारती सभोवतीच्या अनुलग्न जमिनीचा भाडेपट्टा व इमारतीच्या मालकीचे अभिहस्तांतरण सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नावे करण्यात येईल. सदनिकांची किंवा इमारतीची दुरुस्ती सदनिका धारकांची किंवा सहकारी गृहनिर्माण संस्थेने स्वत: करावयाची आहे. लाभार्थींना सहकारी गृहनिर्माण संस्था विहित कालावधीमध्ये स्थापन करण्याची कार्यवाही करावी लागेल.

ई. या माहिती पुस्तकेत दिलेला तपशिल परिपूर्ण नाही, तो फक्त निर्देशक आहे. सदनिकांच्या वितरणाच्या अटी व शर्ती, यशस्वी लाभार्थींना वेळोवेळी म्हाडाद्वारे कळविल्या जातील व त्या लाभार्थींना बंधनकारक राहतील. तसेच महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण व सदनिकेची अदलाबदल) विनियम १९८१, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीची विल्हेवाट) नियम १९८१ च्या तरतुदी वेळोवेळी होणाऱ्या सुधारणांसह अर्जदारास जशाच्या तशा व संपूर्णपणे बंधनकारक राहतील.

उ. वितरीत झालेल्या सदनिकेच्या विक्री किंमतीवर महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार आवश्यक मुद्रांक शुल्काचा भरणा, संबंधित नोंदणी कार्यालय यांचेकडे तसेच सदनिकेचे आगाऊ वार्षिक सेवा शुल्क हे कोंकण मंडळांतर्गत सर्व योजनांकरिता लागू आहे व त्याचा भरणा संबधित मिळकत व्यवस्थापक यांचे कार्यालयाकडे अदा करावे लागतील. तसेच शासनाच्या धोरणानुसार / अधिसूचनेनुसार मंडळाने विक्रीकरीता काढलेल्या सदनिकेस विक्री किंमती व्यतिरिक्त वस्तु व सेवा कर (Goods & Service Tax) लागू झाल्यास सदर कर संबंधित कार्यालयाकडे भरणा करणे आवश्यक आहे. त्यानंतरच सदनिकेचा ताबा दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

## ९. १५% एकात्मिक योजना (ITP)/२०% सर्वसमावेशक योजनांअंतर्गत सदनिकांची माहिती

**१५% एकात्मिक व २०% सर्व समावेशक योजनेकरिता संगणकीय प्रणाली अंतर्गत सोडत पूर्व पात्रता निश्चितीकरिता विशेष सूचना**

१. सदनिकेचा ताबा देणे व आनुषंगिक बाबी विकासकांकडून करण्यात येतील.

२. यशस्वी लाभार्थ्यास सदनिकेची अंदाजित विक्री किंमत UDCPR-PARA 3.8.2 व 14.1.1.9 मधील तरतूदीनुसार भरणा करावी लागेल. गृह कर्ज उभारणीसाठी **''ना हरकत प्रमाणपत्र''**, ताबा इ. आनुषंगिक बाबी विकासकाकडे यशस्वी लाभार्थ्याने करणे क्रमप्राप्त आहे. जाहिरातीत नमूद केलेली किंमत सदनिकेची मूळ विक्री किंमत असून लाभार्थ्यांना जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या सदनिकांच्या रक्कमेव्यतिरीक्त **जीएसटी, स्टॅम्प ड्युटी, रजिस्ट्रेशन चार्जेस, प्रॉपर्टी टॅक्स व शासकीय / महानगरपालिकेकडील शुल्काचा भरणा तसेच शासकीय देय शुल्काचा भरणा करावा लागेल.** या योजनेअंतर्गत यशस्वी लाभार्थ्याने म्हाडाकडे विक्री किंमतीच्या १% प्रशासकीय शुल्काचा भरणा करणे क्रमप्राप्त आहे. तद्नंतर तात्पुरते देकारपत्र देण्याची कार्यवाही केली जाईल. सदर प्रकल्पामध्ये सामाईक पार्किंग उपलब्ध असून या व्यतिरिक्त स्वमालकीचे कव्हर्ड पार्किंग (उपलब्धतेनुसार) हवे असल्यास विकासकाकडे संपर्क साधावा लागेल, याची कृपया नोंद घ्यावी. ज्या प्रकल्पांना भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही, त्या प्रकल्पातील सदनिकांची अंतिम विक्री किंमत प्रकल्पास भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्याच्या वर्षाच्या असर वार्षिक विवरण दर (ASR) दरानुसार परिगणित करुन मंडळाद्वारे अंतिम करण्यात येतील. २० % योजनांमध्ये लाभार्थ्याने सदनिका समर्पित केल्यास विकासकास म्हाडाच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार म्हाडाने कळविलेल्या विक्री किंमतीच्या १% रक्कम वजावट करुन उर्वरित रक्कम लाभार्थ्यास विकासकाने परतावा करणे बंधनकारक आहे. तसेच लाभार्थ्याने मंडळास भरणा केलेल्या प्रशासकिय रक्कमेतून रु. १०००/- वजावट करुन उर्वरित रक्कम लाभार्थ्यास विना व्याज परतावा केली जाईल

३. या योजनेअंतर्गत म्हाडाकडे १% प्रशासकीय शुल्काचा भरणा केल्यानंतर लाभार्थ्यांना गृह कर्ज उभारणीसाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी विकासकाची राहिल.

४. सदर १% रक्कम तात्पूरत्या देकार पत्र निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांत पात्र लाभार्थ्यांनी म्हाडाकडे भरणा करावी व सदनिकेची उर्वरित विक्री किंमत विकासकाने लाभार्थ्यांना लेखी पत्रान्वये कळविलेल्या वेळापत्रकानुसार मुदतीत भरणा करणे बंधनकारक राहिल. विकासकाने दिलेल्या वेळापत्रकानुसार लाभार्थ्याने सदनिकेच्या उर्वरित विक्री किंमतीचा भरणा न केल्यास व विकासकाने तसा प्रस्ताव सादर केल्यानंतर सदनिका वितरण रद्द केले जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

५. सदर प्रकल्पामध्ये सामाईक पार्किंग उपलब्ध असून या व्यतिरिक्त स्वमालकीचे कव्हर्ड पार्किंग (उपलब्धतेनुसार) हवे असल्यास विकासकाकडे संपर्क साधावा लागेल व त्याकरिता विकासकाद्वारे विक्री किंमत व्यतिरिक्त अतिरिक्त किंमत मागणी केल्यास ती भरणे क्रमप्राप्त राहील. व त्याकरिता म्हाडा जबाबदार राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

६. यशस्वी व पात्र ठरलेला अर्जदार विवाहित असल्यास सदनिकेचे वितरणपत्र व ताबा पत्र अर्जदार व त्याची पती/पत्नी या दोघांच्या संयुक्त नावे देण्याची कार्यवाही ही महाराष्ट्र शासन पत्र क्र. न्यायाप्र-२०१५/प्र.क्र.१६८/गृनिभू/ गृनिवि, दि.२४/०९/२०१५ अन्वये करणे विकासकास क्रमप्राप्त आहे. याची कृपया यशस्वी लाभार्थ्याने नोंद घ्यावी.

७. **सदर प्रकल्पाची विकासकामार्फत महारेरा कायद्याअंतर्गत झालेल्या नोंदणी नुसार लाभार्थ्यांनी टप्पेनिहाय रक्कमेचा भरणा करणे बंधनकारक राहील. महानगर पालिकेचे सर्व कर, पाणीपट्टी, मलः निस्सारण आकार, वीज आकार इत्यादी यशस्वी अर्जदारांनी/सहकारी गृहनिर्माण संस्थेस त्या त्या स्थानिक संस्थाकडे परस्पर भरावे लागतील.**

८. यशस्वी अर्जदारांनी विकासकाकडून स्थापन होणाऱ्या गृहनिर्माण संस्थेचे सभासद होणे बंधनकारक राहील.

९. सदर योजनेतील सदनिका या एकात्मिक योजना (ITP)/सर्व समावेशक योजना या साठी मंजूर करण्यात आले आहे. सदर योजनेसाठी म्हाडामार्फत फक्त पात्र लाभार्थ्यांची यादी विकासकास द्यावयाची आहे.

१०. सदनिकेच्या विक्री किंमतीमध्ये १% रक्कम प्रशासकीय खर्च म्हणून अंतर्भाव आहे. सदर रक्कम पात्र लाभार्थ्यांना म्हाडाकडे भरणा करावयाची आहे व विक्री किंमतीचा भरणा विकासकाकडे भरावयाचा आहे.

११. सदर योजनेबाबत म्हाडा धोरणामध्ये बदल झाल्यास ते अर्जदारास बंधनकारक राहील.

# कोंकण मंडळ अंतर्गत २०% सर्वसमावेशक योजनेतील लाभार्थ्यांनी म्हाडाकडे व विकासकाकडे भरावयाच्या रकमेचा तपशील

| अ. क्र. | संकेत क्र. | योजनेचे ठिकाण व विकासकाचे नाव | उत्पन्न गट | एकूण उपलब्ध सदनिका | म्हाडाकडे भरणा करावयाची रक्कम | लाभार्थ्यांनी विकासकाकडे भरावयाची रक्कम | सदनिकेची विक्री किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| 1 | 387-A | Skylark Infrastructure S. No. 135, H. No. A,B,C,D, Mouje Kausa | LIG | 1 | 4200/- | 20,54,000/- | 20,58,200/- |
| 2 | 388-A | Glory Township LLP S. No. 88/4, 89, 90/1, 90/2/4, 90/2/5, 90/4/2, 101/1-B, 101/2, 101/3 Palm Vista, Mouje Diaghar, Thane | LIG | 2 | 4700/- | 23,19,700/- | 23,24,400/- |
